दैनिक

# दिव्य वतन

जनसामान्यांचा बुलंद आवाज

नागपूर, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, वर्धा, यवतमाळ, अकोला, वाशीम, बुलडाणा, नांदेड, हिंगोली, परभणी, लातूर, धाराशिव, अहिल्यानगर, छ. संभाजीनगर, बीड, जालना, नंदुरबार, धुळे, नाशिक

RNI Number MAHBIL/२५/A०७८१ | E-mail : divyawatanngp@gmail.com | शनिवार दिनांक ३१ जानेवारी २०२६ | अंक : १७६ वा वर्ष : २ रे, मूल्य : ३ रुपये, पृष्ठे : ८




अजित पवारांच्या निधनानंतर शरद पवार सक्रिय

(पान ८ वर)



कोहलीचे इंस्टाग्राम अकाउंट पुन्हा दिसू लागले...

(पान ७ वर)

# सुनेत्रा पवार महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री होणार


## पद स्वीकारण्यास होकार, आजच शपथविधी होण्याची शक्यता

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

मुंबई- महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर उपमुख्यमंत्री पदावर कोण बसणार, अशी चर्चा सुरू झाली असून यात सुनेत्रा पवारांच्या नावावरच शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, सुनेत्रा पवारांनी उपमुख्यमंत्री पद स्वीकारण्यास होकार दिला असल्याचे समजते. तसेच उद्याच सायंकाळी 5 वाजता शपथविधी देखील पार पडणार असल्याची माहिती समोर येत आहे. त्यानुसार सुनेत्रा पवार, पार्थ पवार आणि जय पवार हे मुंबईकडे रवाना झाले आहेत.

अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल आणि छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची देखील भेट घेतली होती. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाची शनिवारी दुपारी 2 वाजता महत्त्वाची बैठक होणार असून या बैठकीत उपमुख्यमंत्री पदासाठी सुनेत्रा पवारांच्या नावावर शिक्कामोर्तब होणार असल्याचे बोलले जात आहे. इतकेच नव्हे तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा देखील सुनेत्रा पवारच असाव्यात यावर पक्षातील नेत्यांचे एकमत झाल्याची माहिती समोर आली आहे. तसेच पार्थ पवारांना राज्यसभेवर पाठवण्याची चर्चा सुरू असल्याचेही समजते.

उद्याच्या बैठकीत सगळ्यांचे एकमत झाले तर उद्याच शपथविधी होऊ शकतो, असे सूचक विधान छगन भुजबळ यांनी पत्रकारांशी बोलताना केले होते. त्यामुळे सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री होणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. सुनेत्रा पवार



उपमुख्यमंत्री झाल्या, तर त्या महाराष्ट्राच्या पहिल्या उपमुख्यमंत्री ठरतील. तसेच नरेश आरोरा हे सुनेत्रा पवारांचा निरोप घेऊन मुंबईकडे रवाना झाल्याचे देखील समोर आले आहे. राजकीय गोष्टींची चर्चा करण्यासाठी सुनेत्रा पवारांनी नरेश आरोरा यांना बारामती येथे बोलावले असल्याची माहिती आहे. त्यानुसार नरेश आरोरा आणि सुनेत्रा पवार यांच्यात चर्चा झाल्यानंतर त्यांचा निरोप घेऊन आरोरा मुंबईकडे रवाना झाले असल्याची माहिती समोर आली आहे.

पत्रकारांशी बोलताना छगन भुजबळ म्हणाले, लोकांची जी मागणी आहे ती रास्त आहे. सुनेत्रा ताईंकडे पक्ष प्रमुख पद देण्यात यावे. अनेक लोकांची अशी मागणी आहे आणि त्यात काही चूक आहे, असे मला वाटत नाही. पण शेवटी याबाबत जो काही निर्णय होणार आहे तो सीएलपीमध्ये होईल. भुजबळ यांना दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या चर्चेविषयी विचारले असता, त्यांनी याबाबत मला फारसे काही माहित नसल्याचे स्पष्ट केले आहे.

सुनील तटकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. त्यासंदर्भात बोलताना म्हणाले, आज मी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली हे खरे आहे. सुनेत्रा वहिनी आणि कुटुंब धार्मिक विधीमध्ये आहेत. धार्मिक विधी झाल्यानंतर आम्ही सर्व चर्चा करणार आहोत. आणि त्यानंतर आम्ही ठरवू. जे काही जनतेच्या मनात आहे, कार्यकर्त्यांच्या मनात आहे त्यानुसार निर्णय घेऊ. आज आपण पाहत आहोत की संपूर्ण राज्य शोकात आहे. दादांचे सर्व पैलू संबंध महाराष्ट्राने अनुभवले आहेत. त्यातच आम्ही आहोत, असे तटकरे यांनी म्हटले आहे.

### राष्ट्रवादीच्या निर्णयाला आमचा पाठिंबा - देवेंद्र फडणवीस



**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, कुठलाही निर्णय जो काही घ्यायचा असेल तो राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष घेईल. त्यांनी घेतलेल्या निर्णयाला आमचा पाठिंबा असेल. पवार कुटुंब असेल किंवा पक्ष असेल आम्ही त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहोत. माझ्यासोबत दोनवेळा चर्चा करून राष्ट्रवादीचे नेते गेले आहेत. परंतु, त्यांचा जो निर्णय होईल त्यावर मी बोलणे योग्य नाही.**

### पक्षाध्यक्ष पदावरही होणार निर्णय

**अजित पवारांच्या राष्ट्रवादी पक्षाची उद्या 11 वाजता महत्त्वाची बैठक पार पडणार आहे. या बैठकीत पक्षाध्यक्ष पदावर कोण असणार यावर देखील निर्णय घेतला जाणार आहे. सुनेत्रा पवारच पक्षाच्या अध्यक्षा असाव्यात, अशी लोकांची भावना आहे. त्यानुसारच पक्ष निर्णय घेईल, असे बोलले जात आहे. दरम्यान, पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांचे देखील पक्षाध्यक्ष पदासाठी नाव चर्चेत असल्याचे समजते.**

## महत्त्वाचे...

### १०० युनिट वीज वापरणाऱ्यांना 'स्मार्ट' सोलार



मुंबई-शासनाने तीन महिन्यांपूर्वी स्वयंपूर्ण महाराष्ट्र निवासी रूफटॉप (स्मार्ट) सोलार योजना सुरू केली. यातून दरमहा १०० युनिटपेक्षा कमी वीज वापरणाऱ्या अल्प उत्पन्न व बीपीएल कुटुंबांना ९०% ते ९५% अनुदानासह छतावरील सौरऊर्जा संच बसवला जाईल. त्यामुळे २५ वर्षे मोफत किंवा शून्य वीज बिलाचा लाभ मिळेल.

स्मार्ट योजनेतून ९० टक्क्यांपर्यंत अनुदान : राज्य शासनाने ऑक्टोबर २०२५ पासून ही योजना अमलात आणली आहे. दरमहा १०० युनिटपेक्षा कमी वीज वापरणाऱ्या अल्प उत्पन्न गटातील तसेच बीपीएल कुटुंबांना या योजनेचा प्राधान्याने लाभ दिला जात आहे. १ किलोवॅट क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प बसवण्यासाठी सुमारे ७० हजार रुपये खर्च अपेक्षित आहे.

यामधून केंद्र व राज्य शासनाकडून ४७ हजार ५०० रुपयांपर्यंत अनुदान दिले जाणार आहे. लाभार्थींना केवळ २ हजार ५०० ते १० हजार रुपये इतकाच स्वहिस्सा भरावा लागणार आहे.

### अल्पवयीन मुलगी, तरुणाची आत्महत्या

सिल्लोड तालुक्यातील वडाळा येथे अल्पवयीन मुलगी व २० वर्षीय मुलाने आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना गुरुवारी (२९ जानेवारी) सायंकाळी ५.३० वाजेच्या सुमारास उघडकीस आली. या घटनेत अल्पवयीन मुलीने राहत्या घरी, तर युवकाने शेतात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची माहिती पोलिसांनी दिली. अजिंठा पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक अमोल ढाकणे यांनी दिलेल्या माहितीनुसार १६ वर्षीय आकांक्षा व जीवन संजय मानकर (२०, दोघे रा. वडाळा, ता. सिल्लोड) यांनी आत्महत्या केली.गुरुवारी सायंकाळी ५.३० वाजेच्या सुमारास आकांक्षाने राहत्या घरामध्ये गळफास घेतल्याचे निदर्शनास आले, तर युवकाने शेतात लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. कुटुंबीयांना याची माहिती मिळताच त्यांनी तातडीने दोघांना सिल्लोड येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासून दोघांना मृत घोषित केले.

# सरकारचा मोठा निर्णय:अजित पवार विमान दुर्घटनेच्या CID चौकशीचे आदेश; गूढ उकलणार? अपघातस्थळावर प्रवेश बंदी

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

मुंबई- राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बुधवारी, 28 तारखेला, बारामती येथे झालेल्या भीषण विमान दुर्घटनेत दुर्दैवी निधन झाले. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला असून, राज्यभर शोककळा पसरली आहे. गुरुवारी बारामतीतील विद्या प्रतिष्ठानच्या प्रांगणात अत्यंत शोकाकूल वातावरणात शासकीय इतमामात अजित पवार यांना अखेरचा निरोप देण्यात आला. त्यांच्या पार्थिवाला चिरंजीव पार्थ पवार आणि जय पवार यांनी मुखाग्नी दिला. यावेळी उपस्थित हजारो समर्थकांनी अजित दादा अमर रहेच्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला. त्यांच्या निधनानंतर राज्य सरकारने तीन दिवसांचा शासकीय दुःखवटा जाहीर केला आहे.

अजित पवार यांच्या अचानक जाण्याने केवळ राजकीयच नव्हे, तर सामाजिक आणि प्रशासकीय पातळीवरही मोठी पोकळी निर्माण झाली आहे. अंत्यसंस्कारानंतर आता या विमान अपघाताच्या तपासाबाबत महत्त्वाची माहिती समोर आली आहे. राज्य सरकारने या दुर्घटनेची CID चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. यासोबतच बारामती पोलिसांना अपघातस्थळावर कोणालाही प्रवेश देऊ नये, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. तपास प्रक्रियेत कोणतीही छेडछाड होऊ नये, यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे सूत्रांकडून सांगण्यात येत आहे.

दरम्यान, फॉरेन्सिक पथकाने याआधीच अपघातस्थळी भेट देऊन आवश्यक नमुने तपासणीसाठी गोळा केले आहेत. विमानाचे



अवशेष, जळालेल्या भागांचे नमुने आणि इतर तांत्रिक बाबींची तपासणी सुरू आहे. हा संपूर्ण तपास बारामती पोलिस ठाण्यात नोंद असलेल्या 'एक्सिडेंटल डेथ रिपोर्ट'च्या अनुषंगाने केला जाणार आहे. CID तपासात फॉरेन्सिक अहवाल, एटीसी लॉग्स आणि प्राथमिक माहिती यांचा सखोल अभ्यास केला जाणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

सरकारच्या प्राथमिक अहवालानुसार, हे विमान 28 जानेवारी रोजी सकाळी 8.18 वाजता पहिल्यांदा बारामती एअर ट्रॅफिक कंट्रोलच्या संपर्कात आले होते. त्या वेळी वैमानिकांना सांगण्यात आले की हवामान सामान्य आहे, वाऱ्याचा वेग कमी आहे आणि दृश्यमानता सुमारे 3000 मीटर इतकी आहे. यानंतर वैमानिकांनी रनवे क्रमांक 11 च्या दिशेने येत असल्याची माहिती दिली. मात्र, त्यांना रनवे स्पष्टपणे दिसत नसल्याचे त्यांनी एटीसीला कळवले होते.

थोड्या वेळाने पायलटने पुन्हा एटीसीला कळवले की रनवे दिसू लागल्यावर ते माहिती देतील. त्यानंतर सकाळी 8.43 वाजता रनवे क्रमांक 11 लँडिंगसाठी पूर्णपणे सज्ज असल्याचे एटीसीकडून कळवण्यात आले. मात्र, यानंतर पायलटकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. काही क्षणातच धावपट्टीच्या डाव्या बाजूला अचानक मोठ्या ज्वाळा आणि धुराचे लोट उठताना दिसले, अशी माहिती एटीसीवर कार्यरत असलेल्या एका अधिकाऱ्याने दिली आहे. या दृश्याने नियंत्रण कक्षातही एकच खळबळ उडाली होती.

# मराठवाड्यात विज कंपनीकडून विद्युत स्ट्राईक

### सात जिल्ह्यात नऊ महिन्यात १७२७ विजचोरीच्या घटना

**दिव्य वतन /वृत्तसेवा**



छ. संभाजीनगर : मराठवाड्यात विज वितरण कंपनीच्या वतीने मागील नऊ महिन्यात सात जिल्हयात राबविण्यात आलेल्या विद्युत स्ट्राईकमध्ये १७२७ ठिकाणच्या विजचोऱ्या उघडकीला आल्या असून विज कंपनीने या विजचोरांना १४.४७ कोटी रुपयांची दंड लावला आहे. त्यापैकी ८.८० कोटी रुपयांचा दंड वसूल करण्यात आल्याची माहिती विज कंपनीच्या सुत्रांनी दिली आहे.महावितरण कंपनीच्या छत्रपती संभाजीनगर प्रादेशीक कार्यालयाकडून सह व्यवस्थापकिय संचालक आदित्य जीवने यांच्या मार्गदर्शनाखाली सात जिल्ह्यात विज पुरवठा तपसणी मोहिम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेत संशयास्पद असलेल्या ठिकाणी पथकामार्फत तपासणी केली जात असून त्यातून विज चोरीच्या घटना उघडकीस आणल्या जात आहेत. यामध्ये विशेष पथकामार्फत ३७९९ ठिकाणी विद्युत मिटरची तपासणी व अनियमिततेची पाहणी करण्यात आली आहे. यामध्ये १७२७ विज मिटरमध्ये विजचोरी झाल्याचे आढळून आले आहे.

यापथकाने सर्व ठिकाणी विज चोरीची आकडेवारी तपासल्यानंतर १.६० कोटी युनीट विज चोरी झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

# दादांचा अपघात, तपास अधिकारी विमान कंपनीच्या ऑफिसात; धक्कादायक प्रकार समोर, संशय वाढला

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

नवी दिल्लीः उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बारामतीत विमान अपघातात मृत्यू झाला. अजितदादांच्या अकाली एक्झिटनं संपूर्ण महाराष्ट्र हळहळला. बारामतीमध्ये झालेल्या विमान अपघातात अजित पवारांसह पाच जणांचा मृत्यू झाला. या अपघाताची चौकशी विमान अपघात तपास अन्वेषण विभागानं (एएआयबी) हाती घेतला आहे.

बारामतीत अपघातग्रस्त झालेलं विमान व्हिएसआर कंपनीकडून चालवलं जातं. तपास करणारे एएआयबीचे अधिकारी दिल्लीतील व्हिएसआर कंपनीच्या कार्यालयात पोहोचले. एएआयबीच्या अधिकाऱ्यांनी कंपनीतील अनेक कागदपत्रं सील केली आहेत. दिल्लीतील व्हिएसआरच्या कार्यालयात एएआयबीचे तीन अधिकारी पोहोचले होते.

व्हिएसआर कंपनीचे मालक अपघात झाला, त्याच दिवशी माध्यमांसमोर आले होते. विमानात कोणतीही तांत्रिक अडचण नव्हती. आमची सगळी विमानं योग्य स्थितीत आहेत. त्यामुळे त्यांची सेवा बंद करण्याचा प्रश्नच येत नाही, असं कॅप्टन व्ही. के. सिंह यांनी सांगितलं. सिंह हे व्हिएसआर व्हेंचर्सचे मालक आहेत. ते आणि त्यांचा मुलगा मिळून कंपनी चालवतात. दोघेही पायलट आहेत.एएआयबीचे अधिकारी व्हिएसआर ॲव्हिएशनच्या महिपालपूर येथील कार्यालयात गेले होते. त्यावेळी कार्यालयातील अनेक जण अचानक गायब झालेले आढळून आले. विशेष म्हणजे सकाळी कार्यालयात पोहोचलेले अनेक जण एएआयबीचे अधिकारी पोहोचले तेव्हा गायब झाले होते.

व्हिएसआर कंपनीच्या कार्यालयात पोहोचलेल्या एएआयबीच्या अधिकाऱ्यांनी कंपनीच्या गेटवर असलेल्या सुरक्षा रक्षकाला त्याची ओळख विचारली. त्याच्याकडे ओळखपत्र मागितलं. त्याला आधार कार्ड दाखवण्यास सांगण्यात आलं. तपासात सहकार्य केलंस, तर तुला काहीही होणार नाही, असं अधिकाऱ्यांनी सुरक्षा रक्षकाला सांगितलं. मात्र तरीही त्यानं आपल्याला काहीही माहीत नसल्याचा दावा केला.


सुरक्षा रक्षकाकडे चौकशी केल्यावर अधिकारी आत पोहोचले. त्यावेळी कार्यालयातील दरवाजा आतून बंद असल्याचं आढळून आलं. आत कोणी नसताना दरवाजा आतून बंद कसा, असा प्रश्न निर्माण झाला. त्यामुळे संशयदेखील वाढला. यानंतर थोड्या वेळानं अधिकारी आत पोहोचले. त्यांनी कार्यालयातील अनेक फाईल्स सील केल्या आहेत. कंपनीनं अद्याप तरी यावर कोणतीही माहिती दिलेली नाही.





१ २ ३ ४ ५ ६

## महत्त्वाचे...



### पौर्णिमेच्या पर्वावर महापरित्राण पाठ व धम्मदेशना कार्यक्रम उद्या

नागपूर : पवित्र दीक्षाभूमीवरील महापरित्राण पाठ धम्मदेशना कार्यक्रम रविवार दिनांक १ फरवरी २०२६ रोजी, आयोजित करण्यात येत आहे. बुद्ध संस्कृतीमध्ये माघ पौर्णिमेला विशेष महत्त्व आहे. या दिवशी भगवान बुद्धाने वैशालीच्या चापाल चैत्यामध्ये आपल्या महापरिनिर्वाणाची घोषणा केली होती. माघ पौर्णिमा ही बौद्ध राष्ट्रांत भगवान बुद्धांची करुणा, प्रज्ञा व मैत्रीचा पावन उत्सव म्हणून ओळखल्या जातो. या मंगल पर्वावर परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती दीक्षाभूमी नागपूर आणि भिक्खू - भिक्खुणी संघ व उपासक - उपासिका संघाच्या संयुक्तविद्यमाने रविवार दिनांक १ फरवरी रोजी, सकाळी १० वाजता. महापरित्राण पाठ व विशेष धम्मदेशनेचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे. तरी सर्व बौद्ध उपासक उपासिकांना विनंतीपूर्वक उपस्थित राहण्याचे आवाहन विलास गजघाटे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहेत.

### पवित्र दीक्षाभूमीवर संघदान संपन्न

नागपूर : पवित्र दीक्षाभूमीवर दीक्षाभूमी स्मारक समिती भिक्ष्यु भिक्ष्युणी संघ उपासक - उपासिका यांच्या संयुक्तविद्यमाने संघदान करण्यात आले. प्रारंभी बुद्ध वंदना सुत्रपठण करून उपासक उपासिकांना धम्मदेशना प्रदान करण्यात आली. ७५ भिक्ष्यु - भिक्ष्युणीसह ३०० ते ४०० उपासकासह प्रथम भोजनदान तसेच भिक्ष्यु -भिक्क्ष्युणी संघाला चिवरदान व अष्टपुरिष्कार दान प्रदान केले. तथागत भगवान बुद्धांच्या काळापासून संघदानाची एक महान परंपरा अविरत सुरू आहे. परंपरेनुसार पवित्र दीक्षाभूमीवर संघदानाचा कार्यक्रम संपन्न झाला. व बौद्ध धम्माच्या प्रसार प्रसाराच्या दृढ संकल्प करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विलास गजघाटे व भिक्खू संघानंद, भिक्खू प्रज्ञाज्योती, भिक्खू प्रियदर्शी, भिक्खू धम्मदेश, भिक्खू सम्यय, भिक्खू धम्मप्रकाश, भिक्खुणी विशाखा, भिक्खुणी आम्रपाली, भिख्खूणी संघप्रिया, भिक्खूणी चंद्रशीला, उपासिका मायाताई जामगडे, कविता रामटेके, ज्योती वासनिक, उज्वला मेश्राम, शोभा खोब्रागडे, शीला मेंढे, मंगला खोब्रागडे, सुषमा शेंडे, प्रतिभा मदामे, लता डांगे, अलका जोडापे, अनिता भोरखडे, उपासक विठ्ठल धोंगळे, सुनील भोसले, देवाजी रंगारी, मिलिंद थुल, अशोक शेंडे, विशाल शुक्ला, रंजीत सूर्यवंशी, सुरेश वानखेडे, प्रदीप सोनवणे, या सहा इतर आणि कार्यक्रमाचे संचालन शरद मेश्राम यांनी केले तर सुनील भोसले यांनी आभार मानले.


## नागपूरच्या शाळेत अमानुषतेचा कळस!

# १३ वर्षीय विद्यार्थिनीला शिक्षिका-मुख्याध्यापकांकडून बेदम मारहाण

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**

नागपूर : शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याचा पाया मानले जाते. शाळा म्हणजे ज्ञान, संस्कार आणि सुरक्षिततेचे मंदिर असते. मात्र नागपूर शहरातून समोर आलेल्या एका धक्कादायक घटनेने या संकल्पनेलाच तडा दिला आहे. सातवीत शिकणाऱ्या १३ वर्षीय अल्पवयीन विद्यार्थिनीला किरकोळ कारणावरून शिक्षिका आणि शाळेच्या मुख्याध्यापकांनी बेदम मारहाण केल्याचा गंभीर आरोप समोर आला असून, या घटनेमुळे संपूर्ण शिक्षण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संघर्ष नगर, पिवळी नदी परिसरात राहणारी ही विद्यार्थिनी २२ जानेवारी रोजी शाळेत हिंदीच्या तासाला उपस्थित होती. या दरम्यान तिने आपल्या मैत्रिणीकडून आरसा घेऊन दुसऱ्या विद्यार्थिनीला दिला. हा अगदी किरकोळ प्रकार असताना शिक्षिका तसलीम परवीन यांना याचा राग आला. कोणतीही चौकशी किंवा समज न देता त्यांनी विद्यार्थिनीला तब्बल पाच ते सहा जोरदार थापड मारल्या आणि वर्गाबाहेर काढले, असा आरोप पीडितेने केला आहे. या प्रकारानेही समाधान न झाल्याने पुढे आणखी धक्कादायक घटना घडली. शाळेच्या मुख्याध्यापिका नासरीन अख्तर यांनी विद्यार्थिनीला कार्यालयात बोलावून घेतले. तेथे स्टीलच्या स्केलने तिच्या हात-पायांवर बेदम मारहाण करण्यात आली. या मारहाणीत विद्यार्थिनीला गंभीर दुखापती झाल्या असून ती मानसिक धक्क्यात गेली आहे.




शाळेत सुरक्षित असल्याची भावना पूर्णपणे उद्ध्वस्त झाल्याचे पीडित कुटुंबीयांचे म्हणणे आहे.

पीडितेच्या वडिलांनी सुरुवातीला शाळा प्रशासनाकडे तक्रार दाखल केली. मात्र कोणतीही ठोस कारवाई न करता प्रकरण दडपण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा आरोप केला. अखेर २५ जानेवारी रोजी त्यांनी १०९८ चाइल्ड हेल्पलाईनवर तक्रार नोंदवली. चाइल्ड हेल्पलाईनच्या पथकाने तात्काळ दखल घेत विद्यार्थिनीचा जबाब नोंदवला व समुपदेशन केले. २६ जानेवारी रोजी पीडित विद्यार्थिनीची वैद्यकीय तपासणी नागपूरच्या मेयो रुग्णालयात करण्यात आली.

गुन्हा दाखल

तपासणीत मारहाणीच्या जखमा स्पष्ट झाल्या. त्यानंतर २७ जानेवारी रोजी पोलिसांनी संबंधित शाळेचे सीसीटीव्ही फुटेजही जप्त केले आहे. या प्रकरणी यशोधरा नगर पोलीस ठाण्यात बाल न्याय (बालकांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ मधील कलम ७५, भारतीय न्याय संहितेतील विविध कलमे तसेच आरटीई कायदा २००९ मधील कलम १७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शिक्षणाच्या नावाखाली मुलांवर होणाऱ्या शारीरिक व मानसिक अत्याचारांवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी नागरिक, पालक आणि सामाजिक संघटनांकडून केली जात आहे.

## मौदा नगरपंचायत स्थायी व विषय समिती सभापतींची निवड -काँग्रेसचे वर्चस्व

**दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी**

मौदा- नगरपंचायत ची निवडणूक होऊन नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष पदावर भाजपचे प्रसन्ना तिडके निवडून आले होते तर नगरपंचायत उपाध्यक्षपदी झालेला निवडणुकीत काँग्रेसचे शुभम तिघरे निवडून आले होते. मौदा नगरपंचायतीच्या स्थायी व विविध विषय समिती पदाची निवडणूक निवडणूक नगरपंचायत पार पडली. या विविध समितींच्या सभापतीच्या निवडणुकीत सदस्य संख्या जास्त असल्याने काँग्रेसचेच वर्चस्व राहिले. नगरपंचायत अध्यक्ष प्रसन्ना (राजाभाऊ) तिडके हे स्थायी समितीच्या सभापतीपदी पदसिद्ध निवडून आले तर सार्वजनिक बांधकाम



सभापतीपदी उपनगराध्यक्ष शुभम तिघरे यांची निवड करण्यात आली. शिक्षण क्रीडा व सांस्कृतिक कार्य समिती सभापती पदी काँग्रेसच्या रंजना भाऊराव धनजोडे यांची निवड करण्यात आली तर स्वच्छता वैद्यक आणि सार्वजनिक आरोग्य समिती सभापतीपदी काँग्रेसच्या तारकेश्वरी ताराचंद बारापात्रे यांची निवड करण्यात आली. पाणीपुरवठा, जलनि:सारण व नियोजन समिती सभापतीपदी काँग्रेसचे शरद सुधाकर सावंग यांची निवड झाली तर महिला व बालकल्याण समिती सभापतीपदी काँग्रेसच्या अनिता दशरथ भंडारी यांची निवड करण्यात आली. डिसेंबर महिन्यात झालेल्या मौदा नगरपंचायत च्या निवडणुकीत एकूण १७ सदस्य संख्येमध्ये काँग्रेसचे ११ नगरसेवक, भाजपचे ४ नगरसेवक तर अपक्ष दोन नगरसेवक निवडून आले होते. अपक्ष निवडून आलेल्या उमेदवार उमेश रुपराव गभणे आणि दीपिका चंद्रकांत पोटभरे यांनी भारतीय जनता पार्टीला समर्थन दिले त्यामुळे भाजपकडे सहा नगरसेवक आणि नगराध्यक्ष तर काँग्रेसकडे ११ नगरसेवक असे संख्याबळ सद्यस्थितीत मौदा नगरपंचायत मध्ये आहे. त्यामुळे स्थायी समिती व विषय समितीच्या सभापतींच्या निवडणुकीत एकूण पाच समितीमध्ये काँग्रेसचे सभापती विराजमान झाले त्यामुळे काँग्रेसचेच वर्चस्व दिसून आले.

## हनुमान नगरात सोमवारपासून दासनवमी उत्सवाचे आयोजन

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**

नागपूर-हनुमान नगर सार्वजनिक उत्सव मंडळातर्फे हनुमान नगरातील त्रिकोणी मैदानात राष्ट्रगुरु श्री समर्थ रामदास स्वामी नवमी पुण्यतिथी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे . २ फेब्रुवारी ते ११ फेब्रुवारी या कालावधीत हा उत्सव होईल . २ फेब्रुवारी रोजी शिवमहिम्न आणि शिवलिलामृताचे सामुहिक पठण होईल .३ फेब्रुवारी रोजी ग्रंथराज दासबोधाचे चक्रीपारायण होईल .४ फेब्रुवारी रोजी सामूहिक हरिपाठ आणि ५ फेब्रुवारी रोजी सामूहिकअथर्वशीर्ष पठण होईल. या चारही दिवसांच्या कार्यक्रमाची वेळ सायंकाळी ६ . ०० आहे. शुक्रवार ६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६. ३० वाजता बालकीर्तनकार देवव्रत देशपांडे याचे वासुदेव बळवंत फडके यांच्या चरित्रावर कीर्तन होईल .शनिवार ,७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ . ३० वाजता गोविंदगाथा ही नृत्यनाटिका सादर होईल .

रविवार ८ फेब्रुवारी रोजी सायं .६ . ३० वाजता भक्तिसुधा स्वरमंच (धरमपेठ) यांचे पाऊलभजन होईल. सोमवार ९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ .३० वाजता "नसे अज्ञान दुःख भ्रांती " तसेच मंगळवार १० फेब्रुवारी रोजी " सदा देवकाजी झिजे देह ज्याचा " या विषयावर सविता खरवडे यांचे प्रवचन होईल . बुधवार ,दिनांक ११ रोजी दासनवमीचे दिवशी सकाळी १० .३० वाजता ह.भ.प. राहुलबुवा गणोरकर यांचे ' समर्थ निर्याण ' या विषयावर कीर्तन होईल .याच दिवशी सायंकाळी ५ .०० वाजता भव्य पालखी सोहोळा होईल आणि महाप्रसादाने उत्सवाची सांगता होईल . भाविकांनी या उत्सवाचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## श्रीपाद भालचंद्र जोशी यांच्या तीन पुस्तकाचे प्रकाशन आज

### श्रीपाद भालचंद्र जोशी यांच्या तीन पुस्तकांचे प्रकाशन शनिवार,31 जानेवारीला

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**

नागपूर : डॉ.श्रीपाद भालचंद्र जोशी यांचे राजहंस प्रकाशन प्रकाशित, `त्यानंतर`, पद्मगंधा प्रकाशनातर्फे प्रकाशित `सर्ग` हे दोन कविता संग्रह आणि दिलीपराज प्रकाशनातर्फे प्रकाशित` समीक्षेची संस्कृती आणि संस्कृतीची समीक्षा `हा समीक्षा विषयक ग्रंथ या तीन पुस्तकांचा प्रकाशन समारंभ शनिवार, ३१ जानेवारी, रोजी सायंकाळी ५.४५ वाजता. नागपूर येथील पंचशील चौकातील टिळक पत्रकार भवनात पत्रकार परिषदेच्या दालनात मराठी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश




आवलगावकर यांच्या अध्यक्षतेखाली, प्रख्यात ज्येष्ठ लेखक, समीक्षक डॉ वि.स.जोग यांच्या हस्ते आयोजित करण्यात आला आहे. डॉ. शैलेंद्र लेंडे, मराठी विभाग प्रमुख, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, डॉ. कोमल ठाकरे, अधिष्ठाता, मराठी विद्यापीठ, रिद्धपूर हे संबंधित पुस्तकांवर भाष्य करतील. सूत्रसंचालन शुभदा फडणवीस करतील. याप्रसंगी साहित्य प्रेमींनी आवर्जून उपस्थित राहावे. अशी विनंती, सुनील पाटील कार्यवाह, विदर्भ सांस्कृतिक परिषद, अनिल कुलकर्णी संस्थापक संचालक, विश्व मराठी परिषद व, अभिषेक जाखडे, पद्मगंधा प्रकाशन आणि मधुर व मोहित बर्वे संचालक, दिलीपराज प्रकाशन ह्यांनी केली आहे.

## सत्य–अहिंसेच्या विचारांपासून दूर जाणे देशासाठी घातक: विकास ठाकरे

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**

नागपूर - "आज देशात द्वेष, फूट आणि असहिष्णुतेचे वातावरण निर्माण केले जात असताना राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे सत्य व अहिंसेचे विचारच देशाला एकसंध ठेवू शकतात. या मूल्यांपासून दूर जाणे हे देशाच्या एकतेसाठी घातक आहे," असे ठाम प्रतिपादन विकास ठाकरे, अध्यक्ष, नागपूर शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटी व आमदार, पश्चिम नागपूर यांनी केले. शहीद दिनानिमित्त आज नागपूर येथील व्हरायटी चौक येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. हा कार्यक्रम नागपूर शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटी व जागतिक अहिंसा दिवस आयोजन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने



आयोजित करण्यात आला होता. यावेळी बोलताना विकास ठाकरे म्हणाले की, "महात्मा गांधींच्या विचारांवर उभा असलेला भारत सर्वसमावेशक, लोकशाही आणि संविधाननिष्ठ आहे. मात्र सत्तेच्या लालसेपोटी आज संविधानिक मूल्ये कमजोर करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. काँग्रेस पक्ष देशात सत्य, अहिंसा, समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाच्या विचारांसाठी अखंड लढा देत राहील." या कार्यक्रमात उपस्थित काँग्रेस नेते, नगरसेवक व कार्यकर्त्यांनी गांधीजींच्या विचारांवर चालण्याचा संकल्प व्यक्त करत देशातील लोकशाही, राष्ट्रीय एकात्मता आणि संविधानाचे रक्षण करण्याचा निर्धार केला. कार्यक्रमास विकास ठाकरे, अध्यक्ष, नागपूर शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटी व आमदार, पश्चिम नागपूर, विलास मुत्तेमवार, माजी केंद्रीय मंत्री व अध्यक्ष, जागतिक अहिंसा दिवस आयोजन समिती, आमदार (विधान परिषद) अभिजीत वंजारी तसेच काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अजित पवारांच्या अंत्यविधीला जायचं होतं पण... जुना सहकारी हळहळला, कारण सांगताना रडला

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**

नागपूर : उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पार्थिवावर अत्यंत शोकाकुल वातावरणात बारामतीत अंत्यसंस्कार पार पडले. दादांना अखेरचा निरोप देण्यासाठी देशभरातून सर्वपक्षीय वरिष्ठ नेते उपस्थित होते. अजित पवार यांचे निकटवर्तीय आणि माजी केंद्रीय मंत्री सुबोध मोहिते हे बारामतीला पोहोचू शकले नाहीत. मोठ्या शस्त्रक्रियेनंतर मोहिते नागपूरमधील एका खाजगी रुग्णालयात दाखल आहेत. अजित दादांच्या अंत्यसंस्कारांना उपस्थित राहण्याची त्यांची इच्छा होती, परंतु डॉक्टरांनी त्यांना प्रवासाची परवानगी नाकारली. अजित पवार हे महाराष्ट्रातील अद्वितीय आणि उदार मनाचे नेते होते, अशा शब्दात सुबोध मोहितेंनी त्यांचं कौतुक केलं.

सुबोध मोहिते हे अजित पवारांचे जवळचे सहकारी आणि माजी केंद्रीय मंत्री आहेत. ते नागपूरमधील एका खाजगी रुग्णालयात मोठ्या शस्त्रक्रियेसाठी दाखल आहेत. अजित पवारांच्या अंत्यसंस्कारांना उपस्थित राहण्याची त्यांची तीव्र इच्छा होती, परंतु डॉक्टरांनी त्यांना प्रवासाची परवानगी दिली नाही. मोहिते यांनी अजित पवारांच्या निधनावर दुःख व्यक्त केले आहे.

सुबोध मोहिते हे १४ व्या लोकसभेत रामटेक मतदारसंघातून खासदार होते. २००७ पर्यंत ते शिवसेनेत होते. त्यांनी अटलबिहारी वाजपेयी यांच्या मंत्रिमंडळात अवजड उद्योग मंत्री म्हणून काम केले होते. पुढे त्यांनी काँग्रेसचा हात हाती धरला. अजित पवारांशी त्यांचे नेहमीच जवळचे संबंध राहिले आहेत.अवघ्या एक महिनाभरापूर्वीच अजित पवार नागपूरला मोहिते यांच्या घरी आले होते. या भेटीदरम्यान दोघांनी जवळपास एक तास विविध विषयांवर चर्चा केली आणि एकत्र जेवणही केले होते. या भेटीचे फोटो त्यांनी सोशल मीडियावरही शेअर केले होते.

सध्या सुबोध मोहिते रुग्णालयात दाखल असून, ते सोशल मीडियावर आणि इंटरनेटवर उपलब्ध असलेले अजित पवारांचे फोटो वारंवार पाहत आहेत. त्यांनी रुग्णालयातील कर्मचाऱ्यांकडे वारंवार विनंती केली, परंतु त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यास नकार देण्यात आल्याचे वृत्त एनडीटीव्हीने दिले आहे.

सुबोध मोहिते यांनी अजित पवारांच्या अकाली निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले. त्यांनी अजित पवारांना 'जनतेच्या हृदयाचे राजे' असे संबोधले. "दादा हे महाराष्ट्राचे एक सरळ, उदार आणि अद्वितीय राजकारणी



होते. राजकारण्यांमध्ये हे गुण दुर्मिळ आहेत. त्यांची जागा कोणीही घेऊ शकत नाही."

डॉक्टरांनी त्यांना रुग्णालयातून बाहेर पडण्याची परवानगी न दिल्याने त्यांनी तीव्र निराशा व्यक्त केली. तसेच, दुर्दैवाने अंत्यसंस्कारांना उपस्थित राहता न आल्याने त्यांनी खंत व्यक्त केली.

## महत्त्वाचे...

### आंतरराज्यीय बॅग लिफ्टर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाकडून जेरबंद

बुलडाणा - मुलीच्या वैद्यकीय शिक्षणासाठी कॉलेज फी भरण्यासाठी काढलेले तब्बल ५ लाख रुपये चोरून नेणाऱ्या आंतरराज्यस्तरीय सराईत बॅग लिप्टरास बुलडाणा पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने कर्नाटक राज्यातील शिवमोगा येथून अटक करून मोठे यश मिळवले आहे. विशेष म्हणजे या कारवाईत चोरीस गेलेली संपूर्ण रक्कम आरोपीकडून हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे.वाशीम जिल्ह्यातील रिसोड येथील रहिवासी नितीन जिजेबा पऱ्हाड यांची मुलगी श्रुती हिचा बुलडाण्यातील राजश्री शाहू कॉलेजमध्ये बी.ए.एम.एस. अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळाला होता. सदर प्रवेशाची फी भरण्यासाठी पऱ्हाड यांनी मेहकर येथील स्टेट बँक ऑफ इंडियामधून ५ लाख रुपये रोख काढले. हे पैसे त्यांनी आपल्या कारमध्ये ठेवले व बुलडाण्यासाठी निघाले होते. दरम्यान, मेहकर एसबीआय शाखेपासून दोन अज्ञात व्यक्तींनी त्यांचा पाठलाग केला. पऱ्हाड हे बुलडाणा येथील राजश्री शाहू कॉलेजच्या आवारात पोहोचल्यावर त्यांनी आपली कार पार्क करून कॉलेजमध्ये माहितीसाठी गेले असता अज्ञात चोरट्याने कारच्या काच फोडून आत ठेवलेली ५ लाख रुपयांची रोकड चोरून नेली. या घटनेमुळे कॉलेज परिसरात एकच खळबळ उडाली होती. या प्रकरणी बुलडाणा पोलिसांत १७ सप्टेंबर २०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

### श्री संत गजानन महाराज मंदिरातील दर्शनाच्या आठवणी



शेगाव - महाराष्ट्राच्या राजकारणातील वज्रनेतृत्व, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाची धक्कादायक बातमी समजताच शेगाव अक्षरशः स्तब्ध झाली. क्षणातच संपूर्ण शहरावर शोककळा पसरली आणि प्रत्येकाच्या ओठांवर एकच प्रश्न- हे खरंच झालं आहे का?ही बातमी समजताच शेगावकरांच्या मनात अजित पवार यांच्या शेगाव दौरा, दि. २० जानेवारी २०१९ रोजी श्री संत गजानन महाराजांच्या मंदिरातील त्यांची श्रद्धायुक्त भेट आणि समाधीचे मनोभावे घेतलेले दर्शन जिवंतपणे उभे राहिले. त्या आठवणी आज प्रत्येक भक्ताच्या, प्रत्येक राजकीय कार्यकर्त्याच्या डोळ्यांत पाणी आणणाऱ्या ठरत आहेत. आपल्या शेगाव भेटीदरम्यान अजितदादा पवार यांनी श्री संत गजानन महाराजांच्या मंदिरात अत्यंत साधेपणाने प्रवेश करून समाधीचे दर्शन घेतले होते. कोणताही गाजावाजा नाही, कोणताही अहंकार नाही. फक्त निखळ श्रद्धा! समाधीसमोर काही काळ ते शांतपणे उभे राहिले होते. डोळे मिटून त्यांनी राज्याच्या, शेतकऱ्यांच्या आणि सामान्य जनतेच्या हितासाठी प्रार्थना केली होती. त्या क्षणांत एक कठोर निर्णय घेणारा राजकारणी नव्हे, तर एक श्रद्धावान भक्त दिसत होता, अशी भावना उपस्थित भक्तांनी व्यक्त केली होती.निधनाच्या बातमीमुळे नागरिकांच्या भावनांचा उद्रेक आज त्यांच्या निधनाच्या बातमीने शेगाव शहरातील मंदिर परिसर, राजकीय व सामाजिक क्षेत्र शोकसागरात बुडाले आहे. अनेकांनी ज्यांच्या प्रतिमे समोर दीप प्रज्वलित करून अश्रूंनी श्रद्धांजली वाहिली. “श्रींच्या दर्शनासाठी आलेले अजित पवार आज आठवणीतच उरले,” अशा शब्दांत नागरिकांची भावना व्यक्त होत आहे.

# मुंब्रा पोलिसांची कौतुकास्पद कामगिरी:३ महिन्यांच्या चिमुरडीचे अपहरण करणाऱ्या टोळीला अकोल्यातून अटक

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

अकोला- मुंब्रा परिसरातून अवघ्या 3 महिन्यांच्या मुलीचे अपहरण करणाऱ्या एका टोळीचा मुंब्रा पोलिसांनी छडा लावला आहे. पोलिसांनी अकोला जिल्ह्यातील खेटरी गावातून आरोपींना ताब्यात घेऊन चिमुरडीची सुखरूप सुटका केली आहे.

दिनांक 22 जानेवारी 2026 रोजी सायंकाळी 6 वाजेच्या सुमारास फिर्यादी फरजाना मोहम्मद फिरोज मन्सुरी या आपल्या दोन मुलींना घेऊन मुंब्रा येथील खडीमशीन रोडवरून जात होत्या. त्यांची मोठी मुलगी रडत असल्याने एका अनोळखी बुरखाधारी महिलेने मदतीचा बहाणा केला. 'छोटी बच्ची को मेरे गोद मे देदो, मै भी सामने ही जा रही हूँ' असे म्हणून तिने 3 महिन्यांच्या आफियाला आपल्या कडेवर घेतले आणि संधी मिळताच तिथून पळ काढला.

तपासाचे मोठे आव्हान आणि पोलिसांचे चातुर्य

या घटनेनंतर मुंब्रा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल



करण्यात आला आणि तपासासाठी तात्काळ 4 पथके तैनात करण्यात आली. तपासादरम्यान पोलिसांनी अत्यंत चिकाटीने काम केले. मुंब्रा ते सीएसएमटी आणि मुंब्रा ते टिटवाळा या दरम्यानचे सुमारे 1600 सीसीटीव्ही फुटेज तपासले गेले. विशेष म्हणजे आरोपींनी पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी बाळाचे कपडे आणि स्वतःचा बुरखा बदलला होता. अशा परिस्थित मोठे आव्हान असताना पोलिस पथकाने सलग 6 दिवस दररोज 16 ते 18 तास काम करून तपासाचे धागेदोरे जोडले.

अकोल्यात पडली झडप

तांत्रिक तपास आणि गुप्त बातमीदारांच्या मदतीने पोलिसांनी प्रथम मुंब्रा येथील नसरीन इकलाख शेख हिला ताब्यात घेतले. तिच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, पोलिस पथकाने थेट अकोला गाठले. तेथून मोहम्मद मुजीब गुलाब (31 वर्षे) आणि त्याची पत्नी खैरुणिसा मुजीब मोहम्मद (30 वर्षे) यांना अटक करण्यात आली.

वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून कौतुक


ठाणे शहराचे पोलिस आयुक्त अशुतोष डुंबरे, सह पोलिस आयुक्त ज्ञानेश्वर चव्हाण आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली मुंब्रा पोलिसांनी ही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. सध्या या गुन्ह्याचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक पाखरे करत आहेत.

## वाघाचा हल्ला; पित्याचा मुलासमोरच झाला मृत्यू:धारणी तालुक्यातील घटना

दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी

धारणी- तालुक्यातील हिराबंबई गावातील एका ३७ वर्षीय शेतकऱ्याचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाला. हा शेतकरी त्याच्या १४ वर्षीय मुलासह जंगलात बैल शोधायला गेला होता. त्यावेळी मुलासमोरच वाघाने पित्यावर हल्ला करुन त्यांना जंगलात नेले. या हल्ल्यात शेतकऱ्याचा मृत्यू झाला आहे. समाजमन सुन्न करणारी ही घटना धारणी तालुक्यातील हिराबंबई येथे बुधवारी २८ जानेवारीला सकाळी साडेसात वाजताच्या सुमारास घडली.

दरम्यान या संदर्भात सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार सीताराम बन्सीलाल गुथऱ्या (३७, रा. हिराबंबई ता. धारणी) असे मृतक शेतकऱ्याचे नाव आहे. सीताराम गुथऱ्या यांचा



बैल दिसत नव्हता. त्यामुळे सीताराम गुथऱ्या हे गावापासून काही अंतरावर असलेल्या जंगलात बैल शोधण्यासाठी बुधवारी २८ जानेवारीला सकाळी घरातून बाहेर पडले. या वेळी त्यांच्यासोबत त्यांचा १४ वर्षीय मुलगा तसेच भाचा होता. हिराबंबई जंगलात ते बैलाचा शोध घेत असतानाच सकाळी साडेसात वाजता एका वाघाने सीताराम गुथऱ्या यांच्यावर हल्ला केला. या वेळी त्यांचा मुलगा आणि भाचा काही अंतरावर बैलाचा शोध घेत होते. मुलाच्या डोळ्यादेखतच वाघाने सीताराम गुथऱ्या यांच्यावर झडप घेतली आणि त्यांना जंगलात ओढत नेले. या वेळी त्यांच्या मुलाने आणि भाच्याने आरडाओरड केली मात्र वाघ त्यांना बऱ्याच दूर जंगलात घेवून गेला.दरम्यान या दोन्ही मुलांनी गावात येऊन घडलेला घटनाक्रम गावकऱ्यांना सांगितला. गावकऱ्यांनी वनविभागाला माहिती दिली. त्यांनतर गावकरीसुद्धा तत्काळ सीताराम यांचा शोध घेण्यासाठी जंगलात गेले. काही वेळातच वनविभागाचे जवानसुद्धा आलेत. काही वेळानंतर सीताराम यांचे धड जंगलात आढळले.

या घटनेची माहिती मिळाल्यानंतर धारणी पोलिसांनीसुद्धा घटनास्थळी जाऊन पाहणी केली. या प्रकरणी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.हिरांबबई जंगल परिसरात बुधवारी २८ जानेवारीला घडलेल्या घटनेनंतर आम्ही गस्त वाढवली आहे.

## अकोल्यात कमळ फुलले:शहर सुधार आघाडीची सत्ता कायम, शारदा खेडकर अकोल्याच्या नव्या महापौर

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

अकोला महानगरपालिकेच्या महापौर आणि उपमहापौरपदासाठी शुक्रवारी झालेल्या विशेष सभेत भाजपप्रणित शहर सुधार आघाडीने पुन्हा सत्ता मिळवली आहे. महापौरपदी शारदा रणजित खेडकर यांची निवड झाली, तर अमोल गोगे उपमहापौर बनले.

या निवडणुकीत शहर सुधार आघाडीला ४५ मते मिळाली. त्यांच्या प्रतिस्पर्धी महाविकास आघाडीच्या शिवसेना (उबाठा) गटाच्या उमेदवार सुरेखा मंगेश काळे यांना ३२ मतांवर समाधान मानावे लागले. एमआयएमचे तीन सदस्य तटस्थ राहिले.

शहर सुधार आघाडीकडे ४४ सदस्य होते. त्यांना अपक्ष नगरसेवक आशिष पवित्रकार यांनी पाठिंबा दिल्याने त्यांचे संख्याबळ ४५ झाले. दुसरीकडे, विरोधी गटात काँग्रेसचे २१,



शिवसेना (उबाठा) गटाचे ६ आणि वंचित बहुजन आघाडीचे ५ असे एकूण ३२ सदस्यांनी मतदान केले.शारदा खेडकर या अकोला महापालिकेच्या नवव्या महापौर ठरल्या आहेत. या विजयामुळे महापालिकेत भाजपची सत्ता कायम राहिली आहे. पीठासीन अधिकारी जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या अध्यक्षतेखाली मनपाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात ही विशेष सभा पार पडली.नवनिर्वाचित महापौर शारदा खेडकर यांनी शहर विकासाला आपले प्राधान्य राहील, असे सांगितले. तर, विरोधकांनी भाजपने मुस्लिम नगरसेवकांना फोडल्याचा आरोप केला आहे.शहर सुधार आघाडीचे मूळ संख्याबळ 44 होते. मात्र अपक्ष नगरसेवक आशिष पवित्रकार यांनी भाजप प्रणित शहर सुधार आघाडीला पाठिंबा दिल्याने हे संख्याबळ 45 वर पोहोचले. दुसरीकडे विरोधी गटात काँग्रेसचे 21, शिवसेना (उबाठा) चे 6 आणि वंचित बहुजन आघाडीचे 5 अशा एकूण 32 नगरसेवकांनी मतदान केले. एमआयएमचे तीन सदस्य मतदानापासून तटस्थ राहिल्याने विरोधकांचा 36 चा दावा प्रत्यक्षात 32 मतांवरच मर्यादित राहिला.

महापौर व उपमहापौर निवडीसाठी ही विशेष सभा जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात पार पडली. शारदा खेडकर या अकोला महापालिकेच्या नवव्या महापौर ठरल्या असून या निकालामुळे महापालिकेत भाजपची सत्ता कायम राहिली आहे.नवनिर्वाचित महापौर शारदा खेडकर यांनी शहर विकासाला प्राधान्य देणार असल्याचे सांगितले. दरम्यान, विरोधकांनी भाजपवर मुस्लिम नगरसेवक फोडल्याचा आरोप केला असून यामुळे राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे.

## फडणवीसांचा स्पष्ट विरोध, तरीही 'या' जिल्ह्यात भाजप-एमआयएमची युती, राजकीय वर्तुळात खळबळ

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

अमरावती : अमरावती जिल्ह्यातील सर्वांत मोठ्या अचलपूर नगर परिषदेत सभापती आणि निवडणुकीत उपसभापतिपदांच्या भाजपने एमआयएमसोबत युती केली आहे. यापूर्वी अकोला जिल्ह्यातील अकोट नगर परिषदेत भाजप-एमआयएम युतीचा प्रयोग झाला होता. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एमआयएमसोबत युती नकोच, असे स्पष्ट करीत कारवाईचा इशारा दिला होता. यानंतरही अचलपुरात एमआयएमचा समावेश असलेल्या गटाशी भाजपने संधान साधत सत्तासमीकरण बदलल्याने राजकीय वर्तुळात चर्चा वाढल्या आहेत.

४१ सदस्यसंख्या असलेल्या अचलपूर नगर परिषदेत नगराध्यक्षपद भाजपच्या रूपाली माथने यांनी पटकावले असले, तरी नगरसेवकांची सर्वाधिक संख्या काँग्रेसकडे आहे. काँग्रेसचे १५ नगरसेवक, भाजपचे नऊ, एमआयएमचे तीन, प्रहार संघटनेचे दोन, राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन, तर तब्बल दहा सदस्य अपक्ष आहेत. याच अपक्षांच्या भूमिकेमुळे परिषदेत सत्तासमीकरणे वारंवार बदलताना दिसत आहेत. याआधी प्रहार आणि काही अपक्षांच्या मदतीने काँग्रेसने उपाध्यक्षपद काबीज केले होते. मात्र बुधवारी विविध विषय समित्यांच्या सभापती व उपसभापतिपदांच्या निवडणुकीपूर्वी राजकीय पटावर नवे मोहरे हलले. नगरपरिषदेतील ज्येष्ठ अपक्ष



नगरसेवक कल्लू महाराज दीक्षित यांनी दहा अपक्षांचा स्वतंत्र गट स्थापन करत त्यात एमआयएमचे तीन आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन सदस्य सामील करून घेतले. त्यामुळे या गटाची संख्या थेट १५वर पोहोचली. विषय समित्यांवर वर्चस्व मिळविण्यासाठी या गटाला आणखी सात सदस्यांचा पाठिंबा आवश्यक होता. काँग्रेसकडे सर्वाधिक संख्याबळ असल्याने या गटाने काँग्रेससमोर तडजोडीचा प्रस्ताव ठेवला. काही विषय समित्यांची सभापतिपदे काँग्रेसला देण्याच्या बदल्यात काही समित्यांवर आपला दावा मान्य करण्याची अट होती. मात्र काँग्रेसने हा प्रस्ताव स्पष्ट शब्दांत लावला. काँग्रेसच्या फेटाळून नकारानंतर कल्लू महाराज दीक्षित यांच्या नेतृत्वाखालील अपक्ष-एमआयएम-राष्ट्रवादी काँग्रेस या गटाने थेट भाजपकडे मोर्चा वळवला. भाजपनेही क्षणाचाही विलंब न करता या प्रस्तावाला हिरवा कंदिल दाखवला आणि एमआयएमचा समावेश भाजपची असलेल्या गटासोबत अनपेक्षित युती अस्तित्वात आली. काँग्रेसला डावलून विषय समित्यांवर वर्चस्व मिळविण्यासाठी भाजपने एमआयएमचा समावेश असलेल्या गटाची घेतलेली मदत हा प्रकार सध्या अमरावती जिल्ह्यातील राजकीय चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे.

## महात्मा गांधी पुण्यतिथि पर कांग्रेस अल्पसंख्यक ने दी भावपूर्ण श्रद्धांजलि

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

नागपुर : राष्ट्रपिता महात्मा गांधी कि पुण्यतिथि अवसर पर विनोभा भावे नगर स्तिथि महात्मा गांधी के पुतले पर माल्यार्पण कर नागपुर शहर कांग्रेस कमेटी ब्लाक 15 के अध्यक्ष मूलचंद मेहर,महाराष्ट्र प्रदेश कांग्रेस कमेटी अल्पसंख्यक विभाग कि प्रदेश सचिव शायदा अहमद खान गांधी जी नमन करते हुए उन्हें भावपूर्ण श्रद्धांजलि दी ईस अवसर पर राजेश कोहाड़,अल्ताफ शेख, एंगेश्व देवांगन,असहद खान, ओमप्रकाश कहाटे, सुनील निपाने, दीपक पटेल,इंद्रपाल खापेकर, मकसूद पटेल, फिरोज शाह,अनिरुद्ध कोहाड़,ठाकरे जी, डेकाटे जी, निलेश धोतरकर,भण्डारकर जी, रितेश कडू, धीरज कुमार आकरे, ललिता मेश्राम, आशा कावड़े, सहित उपस्थित सभी कांग्रेस कार्यकर्त्ताओ ने महात्मा गांधी उनकी पुण्यतिथि पर उन्हें नमन कर भावपूर्ण श्रद्धांजलि दी को




# भरधाव कारचा टायर फुटला, गाडी १० फूट खोल खड्ड्यात उलटली; पती-पत्नीचा जागीच मृत्यू

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

अकोला : राष्ट्रीय महामार्गावर बोरगाव मंजू पोलीस ठाण्याच्या परिसरातील वाशिम्बा नवीन बायपास पाँईटजवळच चालत्या कारचे टायर फुटल्यामुळे अपघात झाला आणि अपघातात कारमधील दाम्पत्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना काल गुरुवारी सकाळच्या सुमारास घडली. कारमधून सात प्रवासी हे नाशिकवरून मध्यप्रदेशसाठी परतीचा प्रवास करत असतानाच ही घटना घडली. अनिता खुशरंग मायवाड आणि खुशरंग भिलूजी मायवाड (रा. बैतूल मध्य प्रदेश) हे दोघेही पती-पत्नी आणि यांच्यासह इतर पाचजण हे बैतूल मध्यप्रदेश येथून काही कामानिमित्त नाशिकला गेले होते.

नाशिकवरून बैतुल मध्यप्रदेशला परतताना प्रवास करत असतानाच, कार क्रमांक (एम.पी 48 झेड 4822) या कारमधून प्रवास करत असतानाच हा अपघात घडला. कारच्या डाव्या साईडचा टायर फुटला. त्यामुळेच हा अपघात घडला असून ही कार रोडच्या कडेला 10 फूट आतमध्ये खोल खड्ड्यात उलटली. अनिता खुशरंग मायवाड आणि खुशरंग भिलूजी मायवाड असं मृतक पती-पत्नी यांचं नाव असून त्यांच्यासोबतच अजून पाचजण देखील प्रवास करत होते. मोनू मुरली हारोळे, शिवा मुरली हारोळे, रोहित खुशरंग मायवाड आणि बामी मायवाड असं त्यांचं नाव असून त्यांना देखील गंभीर दुखापत झाली आहे. 29 जानेवारी गुरुवारी ही घटना घडली असून सकाळच्या सुमारास बोरगाव पोलिसांनी घटनास्थळी तात्काळ धाव घेत जखमींना माँ चंडिका आपत्कालीन शोध व बचाव पथक माध्यमातून अकोला येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी पाठविण्यात आलं. अनिता खुशरंग मायवाड (वय 48) आणि खुशरंग बिल्लूजी मायवाड (वय 50) या दोघांचाही मृतदेहाचा पंचनामा करून शवविच्छेदनासाठी पाठविण्यात



आले. दरम्यान, ही घटना जिथे घडली त्याच परिसरातील शेत शिवारात काम करत असताना गजानन देशमुख, गजानन तिडके, नितीन बोपुलकर आणि अन्य शेतकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली व जखमींना मदत केली. घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी हेडकॉन्स्टेबल प्रमोद डोईफोडे, किशोर सोळंके, शुभम फलके आणि ज्ञानेश्वर जामोदे यांनी घटनास्थळी धाव घेत पुढील तपास ठाणेदार अनिल गोपाळ, पोलीस उपनिरीक्षक मनोज उघडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करीत आहेत.

## चिंताजनक विमान दुर्घटना

२८ जानेवारी रोजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या विमानाला झालेल्या भीषण अपघातात त्यांचे दुर्दैवी निधन झाले. अजितदादा पवार यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली त्यांच्या निधनाने महाराष्ट्राचे कधीही भरून न निघणारे नुकसान झाले. त्यांच्यासारखा विकासाची दृष्टी असलेला नेता विमान अपघाताने हिरावून घेतल्याने महाराष्ट्र काही वर्ष मागे गेला. त्यांचे निधन ही महाराष्ट्रासाठी मोठी हानी आहे. अर्थात विमान अपघातात मृत्यू झालेले अजितदादा हे पहिले नेते नाहीत याआधीही अनेक नेत्यांना विमान अपघाताने हिरावून नेले आहे. मागील वर्षी जून महिन्यात सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळावरून लंडनच्या दिशेने निघालेले बोईंग ७८७ - ८ हे विमान उड्डाणानंतर अवघ्या ३१ सेकंदात मेघानीनगर येथील नागरी वस्तीत कोसळल्याने झालेल्या भीषण अपघातात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपाणी यांच्यासह २७५ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. या भीषण अपघाताने देखील सर्वांचेच मन हेलावले होते. हे विमान बी जे मेडिकल कॉलेजच्या हॉस्टेलवर कोसळल्याने त्या हॉटेलमधील ३४ विद्यार्थ्यांचाही दुर्दैवी अंत झाला होता. दोन वर्षापूर्वी जेजू एअरचे बँकॉक ते मुआन या मार्गावरचे विमान कोसळून भीषण अपघात झाल होता. या अपघातात विमान भस्मसात होऊन १७९ प्रवाशी दगावले होते. २०२३ साली ऐन संक्रातीच्या दिवशी नेपाळमध्ये एक मोठी दुर्घटना घडली होती. नेपाळमधील प्रमुख शहरांपैकी एक असलेल्या पोखर या शहराजवळ एक प्रवाशी विमान कोसळून झालेल्या अपघातात ६० हुन अधिक प्रवाशांचा दुःखद अंत झाला होता. अहमदाबाद येथे झालेला विमान अपघात हा विमानात तांत्रिक बिघाड झाल्याने झाल्याचे सांगण्यात आले होते. अजितदादांच्या विमानाला झालेल्या अपघाताचे कारण शोधण्याची विनंती महाराष्ट्र सरकारने केंद्र सरकारकडे केली आहे. या अपघाताची सखोल चौकशी लवकरच होईल आणि त्यात या अपघाताचे खरे कारण समोर येईल. बहुतेक विमान अपघात हे खराब हवामानामुळेच झाल्याचे सिद्ध झाले आहे. खरे तर उड्डाणापूर्वी प्रत्येक वैमानिकाला हवामानाचा अंदाज सांगितला जातो. या आधारावर तो आपली रणनीती ठरवत असतो. या विमानाचे सारथ्य करणारे वैमानिक आणि सहवैमानिक दोघेही अनुभवी होते. त्यामुळे त्यांच्याकडून चूक झाली असावी असे वाटत नाही अर्थात विमान अपघातात केवळ वैमानिकाचीच चूक असते असे नाही. पक्षी विमानाला धडकून अपघात झाल्याच्याही अनेक घटना घडल्या आहे. ऐनवेळी इंजिनमध्ये बिघाड झाल्याने अपघात होतात. वातावरणात बदल झाल्यानेही अपघात होतात. वातावरणाची दृश्यमानता अचानक कमी होऊन अपघात घडल्याच्याही घटना घडल्या आहेत. वातावरणाची दृष्यमानता कमी असेल तर वैमानिक उड्डाण करत नाहीत. अर्थात पर्वतीय भागात दृष्यमानता कमी असतेच. डोंगराची कमी, जास्त उंची असल्याने आणि सतत बदलणारे हवामान, धुके यामुळे अपघात होण्याची शक्यता असते मात्र अलीकडे अद्ययावत संगणक प्रणाली असल्याने विमान किती उंचावरून जात आहे. हवामानात काय बदल घडत आहे याचा अंदाज वैमानिकांना येतच असतो तरीही काही वैमानिक अतिआत्मविश्वासाने विमान उड्डाण करतात. हवामानाची पर्वा न करता स्वतःसह प्रवाशांचा जीव धोक्यात घालतात. तांत्रिक कारण, खराब हवामान, पक्षाची धडक कारण काहीही असले तरी विमान अपघातात ज्या प्रवाशांचा जीव जातो तो मात्र परत येत नाही. अलीकडे विमान अपघातांचे प्रमाण खूप वाढले आहे. १९७० पासून आजवर ११ हजारांहून अधिक लहानमोठे विमान अपघात झाले असून त्यात ८३ हजारांहून अधिक प्रवासी मृत्युमुखी पडले आहेत. हा आकडा चिंताजनक आहे.

# अकोल्याचे गीतकार संगीतकार यांचे योगदान असलेला 'रमाई'

'रमाई' हा एक हिंदी चित्रपट आहे. दि ६ फेब्रुवारी २०२६ ला संपूर्ण महाराष्ट्रात प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. आपल्या अकोल्यात रिगल टॉकीज मध्ये तो प्रदर्शित होत आहे. ह्या चित्रपटाचे निर्माते राजकुमार रामटेके असून कबीर दा यांनी हा चित्रपट दिग्दर्शित केला आहे. 'रमाई' ची मध्यवर्ती भूमिका प्रेरणा धाबर्डे यांनी साकारली असूनबाबासाहेबांच्या भूमिकेत डॉ.उदय कुमार पडद्यावर दिसणार आहेत.ह्या चित्रपटात राजर्षी शाहु महाराज यांची भूमिका प्रसिद्ध दिग्गज अभिनेते रजा मुराद यांनी केली आहे. सोबतचं मा. राजपाल यादव यांची विशेष भूमिका यामध्ये आहे. ह्या चित्रपटासाठी तीन गीते डॉ . श्रीकृष्ण राऊत यांनी आणि एक गीत गौतम शैडे ह्यांनी लिहिले आहे . हा चित्रपट केवळ चरित्रपट नसून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनातील 'त्यागाची मूर्ती' असलेल्या माता रमाईंच्या संघर्षाचा एक सांगीतिक दस्तऐवज आहे. या चित्रपटातील संगीत आणि भावपूर्ण गाण्यांमध्ये अकोल्याच्या मातीतील दोन दिग्गज कलावंतांचा मोलाचा वाटा आहे.




त्यामध्ये प्रसिद्ध संगीतकार दिनेश अर्जुना उर्फ दिनेश निंबाळकर आणि महाराष्ट्रातील प्रसिद्ध गझलकार कवी साहित्यिक डॉ श्रीकृष्ण राऊत यांचा समावेश आहे. दिनेश अर्जुना यांनी अप्रतिम संगीत दिले आहे. चित्रपटाचे पार्श्वसंगीतही त्यांचेच आहे.तर श्रीकृष्ण राऊत यांनी सुमधुर गीते लिहिली आहेत. विशेष म्हणजे हे दोन्ही दिग्गज कलाकार आपल्या अकोल्याच्या नामांकित श्री शिवाजी महाविद्यालयाचे विद्यार्थी आहेत. श्रीकृष्ण राऊत यांनी श्री शिवाजी महाविद्यालयात वाणिज्य विभागात ३४ वर्षे अध्यापन केले आहे. या चित्रपटाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे याचे संगीत आणि गीत या दोन्ही महत्त्वाच्या जबाबदाऱ्या अकोल्याच्या या दोन सुपुत्रांनी लीलया पेलल्या आहेत.

'रमाई' च्या गीतांना सुमधुर चाली लावण्याचे काम अकोल्याचेच युवा आणि प्रतिभावान संगीतकार दिनेश अर्जुना यांनी केले आहे. त्यांनी सुगम संगीत आणि लोकसंगीताचा सुरेख संगम साधत या चित्रपटाला एक वेगळी उंची मिळवून दिली. गाण्यातील वाद्यांचा वापर आणि सुरांची निवड ही 'रमाई'च्या व्यक्तिमत्त्वाइतकीच साधी पण तितकीच प्रभावी ठरली आहे.ज्येष्ठ कवी डॉ श्रीकृष्ण राऊत यांनी या चित्रपटातील आशयसंपन्न आणि भावपूर्ण गीते लिहिली आहेत. रमाईंचा त्याग, बाबासाहेबांना दिलेली साथ आणि त्यांचा संयम शब्दांत पकडणे सोपे नव्हते. मात्र, डॉ श्रीकृष्ण राऊत यांनी आपल्या लेखणीतून प्रत्येक प्रसंगाला साजेसे काव्य रचले. त्यांच्या शब्दांमुळेच 'रमाई'मधील गाणी प्रेक्षकांच्या काळजाला भिडतात.

आपल्या अकोल्यासाठी ही अभिमानास्पद बाबआहे.या हिंदी चित्रपटाच्या निर्मितीत जेव्हा एकाच शहरातील दोन दिग्गज एकत्र येतात, तेव्हा तो त्या शहराचा गौरव असतो. अकोल्याच्या या दोन्ही मान्यवरांनी आपल्या कलेच्या माध्यमातून आई रमाईंचे चरित्र जागतिक स्तरावर पोहोचवण्यास मदत केली आहे. विशेष म्हणजे या चित्रपटातील गाण्यांना वैशाली माडे, संजीवनी भेलोंडे आणि स्वतः दिनेश अर्जुना यांसारख्या दिग्गज गायकांनी स्वर दिला आहे. ज्यामुळे अकोल्याच्या कलावंतांचे काम अधिक झळाळून निघाले आहे.

अकोल्याचा दिनेश श्री शिवाजी कॉलेजचा विद्यार्थी. याचं पूर्ण नाव दिनेश अर्जुन निंबाळकर. हल्ली मुक्काम मुंबई. जिना-मरना संगीत के लिए अशी प्रतिज्ञा करून हा तरुण मुंबईत गेला. हिन्दी सिनेमासारख्या मायावी दुनियेत आज दिनेश अर्जुना घट्ट पाय रोवून उभा आहे. उदित नारायण, कैलास खेर , रुपकुमार राठोड, विनोद राठोड, हरिहरण, सुखविंदरसिंग, कविता कृष्णमूर्ती, अनुराधा पौडवाल, श्रेया घोषाल, वसुंधरा दास, रिचा शर्मा, हरजित कौर, मधुश्री, हिमानी अशा प्रख्यात गायक कलावंतानी त्याच्या संगीत दिग्दर्शनात गाणी गायिली आहेत.

श्रद्धा इन दि नेम ऑफ गॉड ' या हिंदी चित्रपटानंतर 'माय हजबण्डस् वाईफ' हा दिनेश अर्जुना यांनी संगीत दिलेला दुसरा हिंदी सिनेमा प्रदर्शित झाला आहे. रवींद्र नाथ टागोराच्या कथेवर आधारित 'अर्धांगिनी - एक अर्ध सत्य' हा त्यानं संगीत दिलेला तिसरा हिन्दी आणि बंगाली भाषेत एकाच वेळी प्रदर्शित सिनेमा आहे. जयपूरच्या फिल्म फेस्टिवल करिता आणि फ्रान्सच्या कान्स फिल्म फेस्टिवलसाठी 'श्रद्धा' चित्रपटाची निवड झाली आहे. दिनेश अर्जुना हा ख्यातनाम गझल गायक आहे. 'शबनशी' हा उर्दू गझलांचा त्याचा अल्बम टी-सीरीजने प्रकाशित केला. त्या अगोदर 'मौज-ए-सदा', 'साईनाम सुखदायी' आणि 'जय श्री चक्रधरा' अशा कॅसेटस् त्याच्या नावावर जमा आहेत. श्रीकृष्ण राऊत यांच्या गझलांचा 'तसा न चंद्र राहिला' ह्या अल्बमसह त्यांचे मराठी-उर्दू गझलांचे अनेक अल्बम प्रकाशित झाले आहेत. १४ एप्रिल २०११ ला अमिताभ बच्चन, धर्मेंद्र, सुभाष घई यासारख्या दिग्गजांसोबत त्याला भारतरत्न डॉ. आंबेडकर अवार्ड देऊन त्याचा गौरव करण्यात आला. दिनेश अर्जुना ह्यांचे संगीत असलेला 'अर्धांगिणी -एक अर्ध सत्य ' हा चित्रपट एकाच वेळी हिंदी आणि बंगाली भाषेत प्रदर्शित झाला होता. रवीन्द्रनाथ टागोर यांच्या 'घरे बाहेरे ' या कादंबरीवर आधारित हा चित्रपट तेंव्हाचे राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी राष्ट्रपती भवनात आवर्जून पाहिला. त्यातील संगीताची त्यांनी मुक्त कंठाने प्रशंसा केली. त्यावेळी तेथे निर्मात्या सोबत संगीतकार दिनेश अर्जुनाही हजर होते . दिनेश अर्जुना यांनी आजपर्यंत संगीत दिलेले चित्रपट असे -श्रद्धा -इन द नेम ऑफ गॉड ( हिंदी २०११ ),माय हजबँड्स वाइफ (हिंदी २०११),अर्धांगिनी एक अर्धसत्य ( हिन्दी आणि बंगाली २०१६),बोले इंडिया जयभीम (हिन्दी २०१७),तू तिथे असावे ( मराठी २०१८),रोपटं( मराठी २०२३) राडा ( मराठी,हिंदी, तेलगु २०२३),झिंगाड ( मराठी २०२३) क्रूर( हिन्दी २०२५) वाजव रे ( मराठी २०२५), त्यांनी संगीत दिलेले आगामी चित्रपट 'ऑन लाइन मिस्टेक ' ( मराठी), ट्रँगल ( मराठी) फॉरेन रिटर्न वेल सेटल (मराठी ) असे आहेत.





डॉ. श्रीकृष्ण राऊत यांच्या बद्दल वेगळं काय लिहावं, सिर्फ नाम ही काफी है! श्रीकृष्ण राऊत हे महाराष्ट्रातील नामवंत कवी, गझलकार, लेखक, साहित्यिक, गीतकार म्हणून प्रसिद्ध आहेत. आपल्या विदर्भाच्या मातीतील जेष्ठ साहित्यिक, कवी, गझलकार डॉ. श्रीकृष्ण राऊत हे १९८२ पासून गीतलेखन करीत आहेत. ज्यावेळी विज्ञान - तंत्रज्ञान इतके प्रगत नव्हते त्यावेळी आपल्या विदर्भाच्या अकोल्यातून डॅडी देशमुख यांनी दोन महान चित्रपटाची निर्मिती केली. त्यामध्ये 'देवकी नंदन गोपाला'(१९७६ ),'राघू मैना' (१९८२) यांचा समावेश आहे. त्यापैकी 'राघू मैना ' या सिनेमा साठी डॉ. श्रीकृष्ण राऊत यांनी गीतलेखन केले. त्या सिनेमांना पुढे महाराष्ट्र शासनाचे पुरस्कार देखील मिळालेत. २०१४ साली शिक्षणमहर्षी भाऊसाहेब देशमुख यांच्या जीवन कार्यावर आधारित 'ज्ञानगंगेचा भगीरथ 'या चित्रपटाची पटकथा आणि गीतलेखन डॉ. श्रीकृष्ण राऊत यांनी केले आहे. नंतर 'तू तिथे असावे ' (२०१८) 'टेक इट इझी ', (२ ०२० ) मल्हार (२०२४) 'रमाई' या हिंदी चित्रपटासाठी देखील त्यांनी गीतलेखन केले आहे. त्यांचे गीतलेखन असणारे आगामी सिनेमे 'ऑनलाईन मिस्टेक', 'डील','जगा चार दिवस', 'फॉरेन रिटर्न वेल सेटल' हे आहेत.

'टूटा जैसे उँचा परबत
छूटा हाथ से हाथ
छाया बन के चलने वाली
छोड चली है साथ ' हे 'रमाई' च्या मृत्यूनंतरचे डॉ . श्रीकृष्ण राऊत यांच्या लेखणीतून उतरलेले भावस्पर्शी गीत आहे.

गीते ही चित्रपटाचा आत्मा असतात. ती केवळ मनोरंजनाचे साधन नसून, चित्रपटातील पात्रांच्या भावना, त्यांच्या आकांक्षा, दुःख आणि आनंद व्यक्त करण्याचे प्रभावी माध्यम असतात. हे डॉ. श्रीकृष्ण राऊत यांच्या कवी मनाने बरोबर हेरले. श्रीकृष्ण राऊत केवळ शब्दांची जुळवाजुळव करत नाहीत, तर त्या शब्दांमध्ये भावना ओतताना दिसतात.

'रमाई' या चित्रपटात डॉ. श्रीकृष्ण राऊत यांनी भावनांचा अचूक आविष्कार सादर केला आहे. चित्रपटातील प्रसंगाला आणि पात्रांच्या भावनांना न्याय देणारे त्यांचे शब्द आहेत. हे शब्द ऐकून प्रेक्षक पात्रांच्या भावनांशी एकरूप होऊन जातो. श्रीकृष्ण राऊत यांची गीते समजायला सोपी आहेत. सामान्य प्रेक्षकांनाही आठवेल अशी त्यांची शब्दरचना आहे. तसेच, त्यांच्या गीतांना एक विशिष्ट लय आहे. म्हणूनच संगीतकाराला त्यांच्या गीताची चाल बांधणे सोपे जाते.

डॉ.श्रीकृष्ण राऊत हे आपल्या गीत लेखनात काव्यात्मकता आणि सुंदर प्रतिमांचा वापर करतात. ज्यामुळे गीताला एक वेगळी उंची लाभते. हे शब्द कानांना आणि मनाला सुखद अनुभव देतात.चांगले गीत नेहमी काहीतरी नवीन आणि मौलिक घेऊन येते. ते जुन्या कल्पनांची पुनरावृत्ती नसते. तर त्यात एक ताजेपणा असतो. हे आणखी एक वैशिष्ट्य राऊत सरांचे सांगता येईल. डॉ श्रीकृष्ण राऊत एक उत्कृष्ट गीतकार आहेत कारण गीतकारांच्या शब्दांशिवाय सिनेमातील गाणी अपूर्ण आहेत आणि गाण्यांशिवाय सिनेमाचा प्रभाव उणावतो. गीतकार आपल्या लेखणीतून केवळ गाणी लिहीत नाहीत, तर ते प्रेक्षकांच्या मनात कायमस्वरूपी घर करून राहणारे अनुभव निर्माण करतात. सिनेमाच्या यशात गीतकारांचा वाटा अनमोल आहे आणि तो नेहमीच महत्त्वाचा राहील. गीतकारच आहेत जे पडद्यावरच्या दृश्यांना आणि पात्रांना भावनांचा आवाज देतात, ज्यामुळे प्रेक्षक त्या कथेशी आणि पात्रांशी अधिक जोडले जातात. त्यामुळे, सिनेमाच्या यशात गीतकारांचे योगदान हे कधीही दुर्लक्षित करता येणार नाही.

'रमाई' या हिंदी चित्रपटाच्या निमित्ताने अकोल्याच्या कलावंतांनी हे सिद्ध केले आहे की, दर्जेदार साहित्याची आणि संगीताची जाण असेल तर प्रादेशिक मर्यादा ओलांडून हिंदी चित्रपटसृष्टीतही आपला ठसा उमटवता येतो. माता रमाईंच्या स्मृतीला अभिवादन करणारा हा सांगीतिक प्रवास अकोलेकरांसाठी कायमच अभिमानास्पद राहील. आपण सहकुटुंब सहपरिवार नातेवाईक, आप्तेष्ट, मित्र परिवार यांच्यासह हा सिनेमा थियटरमध्ये येवुन अवश्य पाहावा. आणि आपल्या मातीतील या दोन्ही गुणवान कलावंतांच्या कलेचा गौरव करावा हीच प्रेमळ सदिच्छा....


**प्रा. राहुल गोवर्धन माहुरे**
शांती नगर, जुनेशहर, अकोला
मोबा.9822278925

# सफर विज्ञानाची भाग- 21 : चीनी संस्कृती आणि विज्ञानाची वाटचाल

मानवाच्या ज्ञानयात्रेत आपण ज्या क्षणी पश्चिमेकडील सुमेर, नाईल किंवा सिंधू खोऱ्याच्या संस्कृतींकडे पाहतो, त्याच वेळी पूर्वेकडे, आशियाच्या विस्तीर्ण भूमीवर, एक वेगळी पण तितकीच खोलवर रुजलेली संस्कृती आकार घेत होती. चीनमधील ही संस्कृती केवळ काही शतकांची नव्हती; ती हजारो वर्षे अखंड वाहत राहिलेली मानवी विचारांची, श्रमांची आणि निरीक्षणांची नदी होती. ह्वांग हो नदी (Yellow River) आणि यांग्त्से नदी (Yangtze River) यांच्या काठावर मानवाने निसर्गाशी संघर्ष करत नाही, तर त्याच्याशी संवाद साधत जगायचे कसे, हे शिकले. ह्वांग हो नदीला "चीनचे दुःख" असे म्हटले जाते, कारण तिचे पूर अनिश्चित आणि विनाशकारी होते. पण हाच विनाश पुढे सुपीकतेत बदलत असे. पूर ओसरल्यानंतर मागे राहणारी पिवळी गाळमाती शेतीसाठी अमूल्य ठरत असे. या अनुभवातून चिनी मानवाने एक महत्त्वाचा वैज्ञानिक धडा शिकला—निसर्गावर नियंत्रण मिळवण्यापेक्षा त्याच्या चक्राला समजून घेणे अधिक शहाणपणाचे आहे. त्यामुळेच येथे जलव्यवस्थापन, बंधारे, कालवे आणि सिंचनपद्धती विकसित झाल्या. शेती ही केवळ उपजीविका नव्हती; ती ऋतूंचे भान, हवामानाचे निरीक्षण आणि सामूहिक श्रम यांची शिस्त होती. या प्रदेशात बाजरी (millet) आणि तांदूळ (rice) यांची लागवड मोठ्या प्रमाणावर झाली. तांदूळ पिकवण्यासाठी लागणारे पाणी, वेळ आणि श्रम यांचे अचूक नियोजन आवश्यक होते. त्यामुळेच वेळेची जाणीव, पंचांगाची गरज आणि खगोल निरीक्षण यांचा शेतीशी थेट संबंध निर्माण झाला. आकाशातील सूर्याची स्थिती, चंद्राच्या कला आणि तारकांचे बदल हे सर्व केवळ कुतूहलाचे विषय नव्हते, तर पेरणी आणि कापणीसाठी अत्यावश्यक संकेत होते. चीनमधील संस्कृतीची एक मोठी वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट म्हणजे तिचे सातत्य. झिया (Xia), शांग (Shang) आणि झोउ (Zhou) या राजवंशांच्या काळात सत्ता बदलली, राजे बदलले, पण सामाजिक आणि सांस्कृतिक पाया कायम राहिला. शांग काळात कांस्यधातूचा (bronze) वापर अत्यंत प्रगत अवस्थेत पोहोचला. भांडी, शस्त्रे, धार्मिक पात्रे यांवर केलेली नक्षीकाम आणि धातू वितळवण्याची अचूक पद्धत हे त्या काळातील धातुकर्माच्या (metallurgy) उच्च पातळीचे पुरावे होते. येथे विज्ञान आणि कला वेगळी नव्हती; तांत्रिक कौशल्य आणि सौंदर्यदृष्टी एकत्र नांदत होती. धार्मिक विचारसरणीमध्ये पूर्वजपूजा (ancestor worship) केंद्रस्थानी होती. मृत पूर्वज आत्मरूपाने कुटुंबावर लक्ष ठेवतात, त्यांना प्रसन्न ठेवणे हे जिवंत पिढीचे कर्तव्य आहे—अशी धारणा होती. यामुळे कुटुंबसंस्था मजबूत झाली. वडीलधाऱ्यांचा सन्मान, कुटुंबातील शिस्त आणि सामाजिक जबाबदारी ही मूल्ये दृढ झाली. विज्ञान, तंत्रज्ञान किंवा राजकारण यांनाही या नैतिक चौकटीतूनच पाहिले जात असे. लेखनपद्धतीचा विकास हा चीनच्या संस्कृतीतील एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा होता. सुरुवातीला हाडे आणि कासवांच्या कवचांवर कोरलेल्या चिन्हांपासून (oracle bones) ही प्रक्रिया सुरू झाली. ही चित्रलिपी (pictographic script) ध्वनीपेक्षा अर्थावर आधारलेली होती. त्यामुळे भाषा बदलली तरी चिन्हांचा अर्थ टिकून राहिला. याच कारणामुळे चीनमध्ये ऐतिहासिक स्मृती अत्यंत मजबूत राहिली. प्रशासन, करव्यवस्था, कायदे, धार्मिक विधी—सर्व काही लेखी स्वरूपात नोंदवले जाऊ लागले. लेखन हे केवळ साक्षरतेचे साधन नव्हते; ते सत्तेचे आणि ज्ञानसंचयाचे प्रमुख माध्यम बनले. राजसत्ता आणि विज्ञान यांचे नाते चीनमध्ये वेगळ्या स्वरूपाचे होते. राजा हा "स्वर्गाचा पुत्र" (Mandate of Heaven) मानला जात असे. जर देशात दुष्काळ, पूर किंवा महामारी आली,



तर त्याला राजाच्या नैतिक अपयशाचे लक्षण मानले जाई. त्यामुळेच खगोलशास्त्र (astronomy), हवामान निरीक्षण आणि नैसर्गिक घटनांचा अभ्यास राजदरबारात अत्यंत महत्त्वाचा होता. सूर्यग्रहण किंवा चंद्रग्रहण यांची भविष्यवाणी चुकली, तर ज्योतिषांना कठोर शिक्षा होत असे. यामुळे निरीक्षणातील अचूकता, नोंदी ठेवणे आणि गणिती मोजमाप यांना चालना मिळाली. चिनी गणित हे प्रामुख्याने व्यवहार्य होते. जमीन मोजणी, कर आकारणी, धान्य साठवण आणि बांधकाम यासाठी गणिताचा वापर केला जात असे. दशमान पद्धतीसारख्या कल्पना येथे लवकर विकसित झाल्या. मोजमापासाठी प्रमाणित एकके वापरण्याची गरज निर्माण झाली, कारण विशाल साम्राज्यात एकसमान प्रशासन राखणे आवश्यक होते. वैद्यकशास्त्रात चीनने एक स्वतंत्र विचारधारा निर्माण केली. शरीर हे केवळ अवयवांचा समूह नाही, तर ऊर्जा प्रवाहांचा समतोल आहे—ही संकल्पना केंद्रस्थानी होती. या ऊर्जेला (qi) संतुलित ठेवण्यासाठी आहार, औषधी वनस्पती, व्यायाम आणि जीवनशैली यांवर भर दिला गेला. आज आपण ज्याला पारंपरिक चिनी वैद्यक (Traditional Chinese Medicine) म्हणतो, त्यामध्ये निरीक्षण, अनुभव आणि पिढ्यानपिढ्या साठवलेले ज्ञान यांचा समावेश होता. रोग म्हणजे केवळ शारीरिक बिघाड नाही, तर निसर्गाशी तुटलेला समतोल आहे—हा दृष्टिकोन त्या काळात अत्यंत प्रगत मानला जातो. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात चीनने मानवजातीला अमूल्य देणगी दिली. कागद (paper) तयार करण्याच्या प्रक्रियेमुळे ज्ञानप्रसार क्रांतिकारी पद्धतीने सुलभ झाला. त्याआधी बांबूच्या पट्ट्या किंवा रेशीम यांचा वापर केला जात असे, जो महाग आणि अवजड होता. कागदामुळे शिक्षण, प्रशासन आणि साहित्य यांना नवे आयाम मिळाले. रेशीम (silk) उत्पादन ही केवळ उद्योगधंदा नव्हता, तर चीनची आंतरराष्ट्रीय ओळख बनली. रेशीम मार्ग (Silk Road) हा व्यापाराचा मार्ग असला तरी त्यातून धर्म, विज्ञान, कला आणि विचार यांची देवाणघेवाण होत होती. दिशादर्शक सुईचा (compass) शोध हा मानवी प्रवासाच्या इतिहासातील एक निर्णायक क्षण ठरला. समुद्रमार्गे प्रवास अधिक सुरक्षित आणि नियोजित झाला. दारूगोळा (gunpowder) सुरुवातीला धार्मिक विधी आणि फटाके यांसाठी वापरला गेला, पण पुढे त्याचा लष्करी वापर वाढला. येथेही एक गोष्ट लक्षात येते—चीनमध्ये अनेक शोध आधी शांततामय किंवा सांस्कृतिक उपयोगासाठी झाले आणि नंतर त्यांचा युद्धासाठी वापर झाला. तत्त्वज्ञानाच्या पातळीवर चीनने विज्ञानाला नैतिक दिशा दिली. कन्फ्यूशियस (Confucius) यांनी माणसाच्या सामाजिक



कर्तव्यांवर, नीतीवर आणि सुसंवादावर भर दिला. त्यांच्यासाठी आदर्श समाज म्हणजे जिथे प्रत्येक व्यक्ती आपली भूमिका प्रामाणिकपणे पार पाडते. दुसरीकडे ताओ विचारधारेने निसर्गाशी संघर्ष न करता त्याच्या प्रवाहात वाहण्याची शिकवण दिली. "वू वेई" म्हणजे न करण्यातील कृती—हा विचार वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहिला तर तो ऊर्जा बचत, संतुलन आणि अनावश्यक हस्तक्षेप टाळण्याचा संदेश देतो. विज्ञानाच्या या सफरीत चीन आपल्याला एक महत्त्वाचा धडा देतो. प्रगती म्हणजे फक्त नवे शोध लावणे नाही. प्रगती म्हणजे निरीक्षण, अनुभव, नैतिकता आणि सातत्य यांचा समतोल साधणे. निसर्गाशी संघर्ष करून नव्हे, तर त्याला समजून घेऊन पुढे जाणे—हा विचार आजच्या आधुनिक विज्ञानालाही तितकाच महत्त्वाचा आहे. म्हणूनच, चीनमधील प्राचीन संस्कृती ही केवळ भूतकाळातील कथा नाही; ती वर्तमान आणि भविष्याला दिशा देणारी मानवी बुद्धीची एक महान परंपरा आहे.

प्रा.डॉ.जयसिंग गाडेकर
(लेखक विज्ञानाचे अभ्यासक आहेत)

दिव्य वतन हे दैनिक वृत्तपत्र प्रकाशक मालक मुख्य संपादक गोपाल आनंदराव कडुकर यांनी कार्यालय हाऊस नंबर १८ निवास सोसायटी स्वामी समर्थ मंदिर जवळ घोगली रोड बेसा तालुका जिल्हा नागपूर - ४४००३४ येथून प्रकाशित केले. संपर्क मो. ७७०९३७७५१०


## महत्त्वाचे...




### एक उडी, आयुष्य संपलं! रायगडच्या दगड खाणीत तरुणाचा दुर्दैवी मृत्यू.

मुरुड, : बारशिव येथील दगड खाणीत अंघोळीसाठी उतरलेला २५ वर्षीय अमित कुमार रामानंद चौधरी याचा बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. शुक्रवारी (दि. ३० जानेवारी २०२६) ही हृदयद्रावक घटना घडली. क्षणिक आनंदासाठी घेतलेला हा निर्णय त्याच्या जीवावर बेतला. अमित हा मूळचा बिहार येथील असून आदित्य ग्लोबल इन्फ्रा प्रोजेक्टमध्ये कामगार म्हणून बारशिव येथे राहत होता. सदर घटनेप्रकरणानंतर त्याच्या सहकाऱ्याने याप्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. दरम्यान, या घटनेनंतर सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अमित चौधरी शुक्रवारी दुपारी बारशिव येथील दगड खाणीत साचलेल्या पाण्यात अंघोळ करण्यासाठी उतरला होता. सुरुवातीला तो पाण्यात खेळत होता, पण अचानक खोल पाण्यात गेल्याने तो बुडू लागला. त्याच्या सहकाऱ्यांनी हे पाहताच आरडाओरडा करत त्याला तातडीने पाण्यातून बाहेर काढले.

### संध्याकाळच्या गर्दीत मध्य रेल्वे प्रवाशांमध्ये भीती



ठाणे: ठाणे-कळवा रेल्वे मार्गावर संध्याकाळच्या गर्दीच्या वेळी अचानक आगीचा धूर पसरल्याने मध्य रेल्वेवर भीतीचे वातावरण निर्माण झाले. कळवा आणि ठाणे रेल्वे स्थानकांदरम्यान रुळाखालील नाल्यात कचऱ्याला आग लागल्याने आकाशात धुराचे लोट उठले. यामुळे हजारो प्रवाशांची धावपळ उडाली आणि रेल्वे वाहतूक सुमारे १५ ते २० मिनिटे विस्कळीत झाली.

आज संध्याकाळी मध्य रेल्वेच्या मुख्य मार्गावर एक थरारक प्रसंग घडला. नेहमी गजबजलेल्या कळवा आणि ठाणे रेल्वे स्थानकांदरम्यान रुळाखालील एका नाल्यात कचरा पेटला. या आगीमुळे आकाशात धुराचे मोठे लोट दिसू लागले. काही वेळातच संपूर्ण परिसर धुराने भरून गेला.यामुळे रेल्वे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले.

संध्याकाळची वेळ असल्याने लोकल गाड्यांमध्ये प्रचंड गर्दी होती. अशा वेळी हा प्रकार घडल्याने हजारो प्रवाशांची एकच धावपळ उडाली. रुळांवरून येणारा दाट धूर इतका होता की समोरचे काहीही दिसत नव्हते. यामुळे प्रवाशांमध्ये "कुठे आग लागली?", "रेल्वे रुळांवर काही मोठी दुर्घटना तर नाही ना?" अशा चर्चा सुरू झाल्या आणि घबराट पसरली. काही प्रवाशांनी घाबरून लोकलमधून खाली उतरण्याचा प्रयत्न केला, तर काही जणांनी मोबाईलवर या घटनेचे व्हिडिओ काढायला सुरुवात केली. या घटनेची माहिती मिळताच रेल्वे कर्मचारी आणि सुरक्षा पथक लगेच घटनास्थळी पोहोचले. त्यांनी तपासणी केली असता, रेल्वे रुळाखालील नाल्यात मोठ्या प्रमाणात कचरा साचला होता आणि त्याला आग लागली होती.

# राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी सुनेत्रा पवारांसह प्रफुल्ल पटेलांचे नाव चर्चेत, पार्थ पवार राज्यसभेवर जाण्याची शक्यता

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

मुंबई- उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बारामतीमध्ये भीषण अपघातानंतर झालेल्या अकाली निधनाने महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. विशेषतः राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासाठी हा धक्का अधिक गंभीर मानला जात आहे. अजित पवार हे केवळ उपमुख्यमंत्रीच नव्हते, तर पक्षातील सर्वांत प्रभावी नेतृत्व मानले जात होते. त्यांच्या जाण्याने पक्षाच्या नेतृत्वाबरोबरच महायुती सरकारमधील महत्त्वाच्या सत्ताकेंद्रांवरही प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आणि महायुतीत दोन्हीकडेच पुढील दिशा काय असणार, याबाबत जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

अजित पवार यांच्याकडे उपमुख्यमंत्रीपदासोबत अर्थ खाते, उत्पादन शुल्क आणि क्रीडा खात्याची जबाबदारी होती. ही खाती राज्याच्या कारभाराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मानली जातात. त्यामुळे आता ही खाती कोणाकडे सोपवायची, हा प्रश्न सरकारपुढे उभा राहिला आहे. दुसरीकडे, अजित पवार हे राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय नेतृत्वही प्रभावीपणे सांभाळत होते. त्यांच्या अकाली जाण्यामुळे पक्षाच्या राष्ट्रीय पातळीवरील नेतृत्वाची धुरा कोण सांभाळणार, यावरही राष्ट्रवादीतील नेत्यांमध्ये मंथन सुरू झाले आहे.

या पार्श्वभूमीवर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस गटांच्या विलिनीकरणाची चर्चा जोर धरत असतानाच एक वेगळाच प्रस्ताव पुढे आला आहे. अजित पवार यांच्या गटातील राष्ट्रवादी काँग्रेसचे अस्तित्व स्वतंत्रच ठेवावे, अशी भूमिका पक्षातील अनेक नेते मांडत असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे एकीकरणाऐवजी स्वतंत्र वाटचाल करण्याचा पर्याय पुढे येत असल्याचे चित्र आहे. अजित पवार हयात असताना सुरू असलेल्या विलिनीकरणाच्या चर्चांवर आता पूर्णविराम लागणार की नाही, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

राष्ट्रीय अध्यक्षपदी कोण?

राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय नेतृत्वाबाबतही महत्त्वाचा प्रस्ताव चर्चेत आहे. सध्या कार्याध्यक्ष असलेले प्रफुल पटेल यांची पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात यावी, असा सूर पक्षातील नेत्यांकडून व्यक्त केला जात आहे. प्रफुल पटेल हे अनुभवी नेते असून राष्ट्रीय पातळीवर त्यांचा मोठा राजकीय अनुभव आहे. त्यामुळे पक्षाची धुरा त्यांच्याकडे सोपवावी, असा प्रवाह राष्ट्रवादीमध्ये तयार होत असल्याचे बोलले जात आहे. तर दुसरीकडे पक्षातील सर्वात मोठे पद म्हणजे राष्ट्रीय अध्यक्षपद. हे पद अजित पवारांकडे होते. त्यामुळे आताही हे पद पवारांच्या घरातच रहावे. सुनेत्रा पवार या राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्ष व्हाव्यात, अशी मागणी पक्षातील नेत्यांमधून होत असल्याचे समजते. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचा राष्ट्रीय अध्यक्ष कोण होणार, याची उत्सुकता आहे.

भुजबळ, मुश्रीफ, पटेल आणि तटकरे वर्षा निवासस्थानी

उपमुख्यमंत्रीपदासाठीही राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये हालचाली वेगाने सुरू आहेत. अजित पवार यांच्या पश्चात हे पद सुनेत्रा पवार यांनाच देण्यात यावे, असा प्रस्ताव राष्ट्रवादीच्या नेत्यांकडून पुढे आला आहे. याबाबत निर्णय घेण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आज वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करण्यासाठी पाहोचले. छगन भुजबळ, हसन मुश्रीफ, प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे हे नेते वर्षा निवासस्थानी पोहोचले असून, उपमुख्यमंत्रीपदावर सुनेत्रा पवार यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले जात आहे. अजित पवार यांना विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर अंतिम निरोप दिल्यानंतर त्यांच्या सहयोग बंगल्यावर राष्ट्रवादीच्या प्रमुख नेत्यांची एक महत्त्वाची बैठक झाली होती. या बैठकीत सुनेत्रा पवार यांच्याशी सविस्तर चर्चा करण्यात आली. या वेळी पार्थ पवारही उपस्थित होते. या बैठकीत पार्थ पवार यांनी सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्रीपदी संधी देण्यात यावी, तर आपल्याला राज्यसभेवर पाठवण्यात यावे,



असा प्रस्ताव मांडल्याची माहिती समोर आली आहे. या चर्चेमुळे राष्ट्रवादीतील अंतर्गत समीकरणे अधिक स्पष्ट होत असल्याचे दिसत आहे.

विलीनीकरणाच्या चर्चेवर अंतिम निर्णय शरद पवार घेणार


एकीकडे राष्ट्रवादी काँग्रेसचे स्वतंत्र अस्तित्व कायम ठेवण्याची चर्चा, दुसरीकडे नेतृत्वबदलाचे प्रस्ताव आणि महायुतीतील सत्तासंतुलन, या सर्व घडामोडींमुळे राज्याचे राजकारण निर्णायक वळणावर आले आहे. अजित पवार हयात असताना सुरू असलेल्या विलिनीकरणाच्या चर्चेवर अंतिम निर्णय शरद पवार घेणार असल्याची माहितीही पुढे येत आहे. त्यामुळे पुढील काही दिवसांत राष्ट्रवादी काँग्रेस कोणती भूमिका घेते, उपमुख्यमंत्रीपद आणि राष्ट्रीय नेतृत्वाबाबत कोणता निर्णय होतो, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

# राज-उद्धव ठाकरेंबद्दल अपशब्द:सोशल मीडियावर नसती उठाठेव नालासोपाऱ्यातल्या तरुणाची मनसे-शिवसेना कार्यकर्त्यांनी काढली धिंड

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

मुंबई- सोशल मीडियावर राजकीय नेत्यांबद्दल आक्षेपार्ह आणि अपमानास्पद भाषा वापरणे एका तरुणाला चांगलेच महागात पडल्याची खळबळजनक घटना नालासोपारा परिसरात समोर आली आहे. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्याबद्दल एकेरी उल्लेख करत अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन अपशब्द वापरून पोस्ट करणाऱ्या तरुणाला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांनी चोप दिला. या घटनेत संबंधित तरुणाला बेदम मारहाण करण्यात आली असून, त्याची अर्धनग्न अवस्थेत परिसरात धिंड काढण्यात आल्याचे पाहायला मिळाले. या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून, त्यामुळे राजकीय वर्तुळात आणि नागरिकांमध्येही चर्चेला उधाण आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सूरज महेंद्र शिर्के असे या तरुणाचे नाव असून, तो गेल्या काही दिवसांपासून फेसबुक आणि इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर सातत्याने राजकीय नेत्यांविरोधात आक्षेपार्ह पोस्ट करत होता. विशेषतः मनसे अध्यक्ष राज ठाकरे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि आमदार आदित्य ठाकरे यांच्याबद्दल त्याने अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन टीका केली होती. या पोस्टमधून त्याने एकाच नेत्याला मान्य असल्याचे सांगत इतर नेत्यांवर चोर असल्याचे आरोप केले होते. या पोस्टमुळे मनसे



आणि शिवसेना ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली होती.

या तरुणाच्या पोस्ट सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात पसरल्यानंतर कार्यकर्त्यांमध्ये असंतोष वाढत गेला. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्याबद्दल वापरलेली भाषा अत्यंत अश्लील आणि अपमानास्पद असल्याचा आरोप कार्यकर्त्यांनी केला. काही पोस्टमध्ये राज ठाकरे यांच्या भूमिकांवर टीका करताना अपमानजनक शब्द वापरण्यात आले होते, तर उद्धव ठाकरे यांच्याबद्दलही अत्यंत अवमानकारक उल्लेख करण्यात आला होता. या प्रकारामुळे ठाकरे [illegible] यांचे समर्थक एकत्र आ[illegible] या तरुणावर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली.

दरम्यान, मनसेचे उपविभाग अध्यक्ष किरण नकाशे आणि त्यांच्या सहकाऱ्यांना संबंधित तरुण नालासोपारा परिसरात लपून बसल्याची माहिती मिळाली. माहिती मिळताच मनसे आणि शिवसेनेच्या काही कार्यकर्त्यांनी तात्काळ त्या ठिकाणी धाव घेतली. कार्यकर्त्यांनी तरुणाला पकडून त्याचा चोप दिला. इतक्यावरच न थांबता, त्याला अर्धनग्न करून रस्त्यावरून सुमारे दीड किलोमीटरपर्यंत फिरवण्यात आले. या घटनेदरम्यान काही नागरिकांनी मोबाईलवर व्हिडिओ शूट केला.

# अजित पवार NCP एकीकरणासाठी सकारात्मक होते; जयंत पाटलांचा मोठा दावा

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

मुंबई- राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या दोन्ही गटांच्या एकीकरणाबाबत पुन्हा एकदा मोठी चर्चा सुरू झाली असून, शरद पवार गटातील ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी यासंदर्भात महत्त्वाचे विधान केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन गट एकत्र यावेत, हीच आपली सुरुवातीपासूनची भूमिका होती, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. अजित पवार यांच्या निधनानंतर प्रथमच एकीकरणाच्या मुद्द्यावर इतक्या ठाम शब्दांत प्रतिक्रिया देण्यात आल्याने, राज्याच्या राजकारणात नव्या चर्चांना उधाण आले आहे.जयंत पाटील यांनी सांगितले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फुटल्यानंतरही दोन्ही गट पुन्हा एकत्र यावेत, असा त्यांचा प्रयत्न सातत्याने सुरू होता. या भूमिकेतूनच



त्यांनी आणि दुसऱ्या गटातील प्रमुख नेत्यांनी अनेक वेळा बैठका घेतल्या. या बैठका केवळ औपचारिक नव्हत्या, तर त्यामध्ये भविष्यातील राजकीय वाटचाल, निवडणुकांची रणनीती आणि पक्ष एकत्र आणण्याच्या शक्यतांवर सविस्तर चर्चा झाली होती, असेही त्यांनी नमूद केले.

जयंत पाटील यांच्या म्हणण्यानुसार, अजित पवार यांच्यासोबतही या विषयावर अनेकदा सविस्तर चर्चा झाली होती. विलयाच्या मुद्द्यावर अजित पवार सकारात्मक होते, असा ठाम दावा पाटील यांनी केला आहे. दोन्ही गटांमधील गैरसमज दूर करून राष्ट्रवादी काँग्रेस पुन्हा एकसंध व्हावी, अशी भावना अजित पवारांची होती, असेही त्यांनी स्पष्ट केले. या बैठकींमध्ये कोणताही ताणतणाव न ठेवता खुलेपणाने चर्चा झाली होती, असे पाटील यांनी सूचित केले. या चर्चांदरम्यान एक महत्त्वाचा मुद्दा पुढे आला होता, तो म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका. जयंत पाटील यांनी सांगितले की, अजित पवार यांची भूमिका अशी होती की आधी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि अन्य स्थानिक निवडणुका आघाडी करून एकत्र लढवाव्यात. या निवडणुकांमधून जनतेचा कौल समजून घेतल्यानंतर राष्ट्रवादीच्या एकीकरणाबाबत अंतिम निर्णय घ्यावा, असे त्यांचे मत होते.

# तिरंगी, चौरंगी लढतींचा थरार

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

मुंबई- रायगडः अलिबाग तालुक्यात उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अंतिम दिवशी अलिबाग तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले असून, अपेक्षित असलेली सेना–भाजप तसेच भाजप–राष्ट्रवादी युती प्रत्यक्षात फिसकटल्याचे दिसून आले आहे. परिणामी अलिबाग तालुक्यातील सात जिल्हा परिषद मतदारसंघांपैकी चार मतदारसंघात शिवसेना आणि भाजपचे उमेदवार थेट आमने-सामने उभे ठाकले असून, निवडणूक बहुरंगी आणि चुरशीची ठरणार आहे.अलिबाग



तालुक्यात जिल्हा परिषदेचे एकूण सात मतदारसंघ आहेत. त्यापैकी दोन मतदारसंघात सरळ लढत, तीन ठिकाणी तिरंगी, तर दोन मतदारसंघात चौरंगी लढत होत आहे. चेंढरे मतदारसंघात शेतकरी कामगार पक्ष विरुद्ध शिवसेना असा थेट सामना रंगणार आहे. आवास मतदारसंघात शिवसेना विरुद्ध काँग्रेस अशी सरळ लढत होणार असून या दोन्ही मतदारसंघांकडे विशेष लक्ष लागले आहे.

# अजित पवारांच्या अस्थी संकलनावेळी पवार कुटुंब एकत्र:शरद पवार स्वत: उपस्थित, अस्थींचे दर्शन घेतले; संपूर्ण वातावरणात शोक आणि शांतता

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

मुंबई- अंत्यसंस्कारानंतर आज अजित पवारांच्या अस्थी गोळा करण्यात आल्या. बारामतीतील विद्या प्रतिष्ठान परिसरात सकाळी हा विधी पार पडला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार स्वतः उपस्थित होते. त्यांनी अजित पवारांच्या अस्थींचे दर्शन घेतले. या वेळी पार्थ पवार, जय पवार, रोहित पवार, राजेंद्र पवार, रणजित पवार, श्रीनिवास पवार, युगेंद्र पवार यांच्यासह पवार कुटुंबातील अनेक सदस्य आणि निकटवर्तीय कार्यकर्ते उपस्थित होते. संपूर्ण वातावरणात शोक आणि शांतता जाणवत होती.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाने संपूर्ण राज्य शोकसागरात बुडाले असून, गुरुवारी दुपारी बारामतीत त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर दुपारी 12 वाजता हा अंत्यविधी पार पडला. शासकीय इतमामात बंदुकीच्या सलामीसह त्यांना अखेरचा निरोप देण्यात आला. अजित पवार यांच्या जाण्याने राजकीयच नव्हे तर सामाजिक आणि सार्वजनिक जीवनात मोठी पोकळी निर्माण झाली असून, अंत्यसंस्कारावेळी उपस्थित असलेले वातावरण अत्यंत भावनिक होते.

अंत्यसंस्काराच्या वेळी अजित



पवारांचे पुत्र पार्थ पवार आणि जय पवार यांनी आपल्या वडिलांना मुखाग्नी दिला. हा क्षण उपस्थित प्रत्येकासाठी अत्यंत वेदनादायक होता. कुटुंबीय, नातेवाईक, कार्यकर्ते आणि राज्यभरातून आलेले नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हजारो लोकांनी डोळ्यात अश्रू ठेवत आपल्या लाडक्या नेत्याला अखेरचा निरोप दिला. बारामती परिसरात शोककळा पसरली होती आणि प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दुःखाची छाया स्पष्ट दिसत होती.

दरम्यान, अजित पवार यांच्या विमान अपघातप्रकरणी राज्य सरकारने गंभीर दखल घेतली असून या घटनेची सीआयडी चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यासोबतच बारामती पोलिसांना अपघातस्थळावर कोणालाही प्रवेश देऊ नये अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. फॉरेन्सिक पथकाने यापूर्वीच अपघातस्थळी जाऊन आवश्यक नमुने गोळा केले असून, ते तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत.

# ..म्हणून विरोधी पक्षनेता नेमला जात नाही:राज्य दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर, रेवडी वाटून निवडणूक जिंकण्याचा खेळ- विजय वडेट्टीवार

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

मुंबई- विरोधी पक्षनेते पदासाठी कायदा करण्याचा अधिकार हा केंद्र सरकारकडे असायला हवा. उपमुख्यमंत्री पद हे देखील घटनात्मक पद नाही ते दोन नेमले जातात. पण घटनेत तरतूद असलेले विरोधी पक्षनेता हे पद रिकामे ठेवता यावर संशोधन करण्याची गरज काय? महाराष्ट्र लुटण्यासाठी अडचण ठरु नये म्हणून विरोधी पक्षनेता निवडला जावू नये ही सरकारची भूमिका असल्याचा आरोप काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.

चंद्रपूरमधील आमच्या काही नगरसेवकांना चाकू, तलवार, बंदूक यांचा धाक दाखवत शिवीगाळ करण्यात आली त्यांना पळून नेण्याचा प्रयत्न करण्यात आला. ज्या व्यक्तीवर हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे तो धानोरकर यांच्या गटाचा पराभूत उमेदवार आहे असे मी ऐकले आहे, नेमके या प्रकरणी संपूर्ण माहिती नाही, गुन्हेगार कोण आहेत, कुणाच्या जवळचे आहेत याबद्दल मला माहिती नाही, असे काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

दोन्ही राष्ट्रवादीने एकत्र यावे


विजय वडेट्टीवार म्हणाले की, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांनी एकत्र यावे का नाही हा त्यांचा अंतर्गत प्रश्न आहे पण मला वाटते की दोन्ही राष्ट्रवादी एकत्र यावेत अजित पवार आता नाहीत अशा परिस्थितीत कुठल्याही पक्षाची ताकद एकवटली पाहिजे. जनतेला त्या पक्षाकडून काही अपेक्षा आहेत, त्यांच्या विचारधारेशी अनेक लोकं जोडले गेले आहेत ते जोपासण्यासाठी दोन्ही राष्ट्रवादीने एकत्र यावे असे मला वाटते. पण तो त्यांचा प्रश्न आहे की कसे एकत्र यायचे आणि कुठल्या प्रश्नावर एकत्र यायचे. शरद पवार यांनी कुटुंबाला एका माळेत बांधण्याचे काम केले आहे. ही जबाबदारी आता युवा पिढीने एकत्र सांभाळली पाहिजे.

सुनेत्रा पवारांना मंत्रिपद दिले तरच चांगलेच

विजय वडेट्टीवार म्हणाले की, सुनेत्रा पवार यांना जर उपमुख्यमंत्री करायचे हा त्यांच्या पक्षाचा प्रश्न आहे. त्यांच्याकडे असेही एक मंत्रिपद राखीव आहेच. एक महिला जर उपमुख्यमंत्री होत असेत तर पहिल्यांदा महिला उपमुख्यमंत्री मिळेल याचा आम्हालाही आनंदच आहे. त्यांना पद दिले तर चांगलीच गोष्ट होईल.

राज्य दिवाळखोरीत निघाले

विजय वडेट्टीवार म्हणाले की, राज्य दिवाळखोरीत निघाले आहे. निवडणूक जिंकण्यासाठी रेवडी वाटल्या जात आहेत. त्यामुळे राज्याची आर्थिक परिस्थिती न बघता केवळ सत्ता मिळवण्यासाठी राज्याचे वाटोळे करण्याचा अधिकार यांना दिला कोणी? असा सवाल वडेट्टीवार यांनी केला आहे. निवडणुकीच्या तोंडावर हे सगळे निर्णय होतात आणि निवडणूक जिंकल्या जातात यावेळी निवडणूक आयोग काय करते असा सवालही



त्यांनी केला आहे. निवडणूक आयोगाने कठोर भूमिका घेतली पाहिजे पण ते कठोर भूमिका घेऊ शकत नाहीत. ते सरकारच्या हातामधील खेळणं झाले आहेत.

## फॅशन...

### श्वेता तिवारीचा साधेपणा चाहत्यांच्या मनात घर करून गेला...



टीव्ही इंडस्ट्रीमध्ये अनेक अभिनेत्री आल्या लोकप्रिय झाल्या आणि काळाच्या ओघात मागे पडल्या. पण काही व्यक्तिमत्त्वं अशी असतात, जी काळासोबत अजूनच खुलत जातात त्यापैकीच एक नाव म्हणजे श्वेता तिवारी. अभिनय, सौंदर्य, फिटनेस आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे तिचा साधेपणातून उठून दिसणारा स्टाइल यामुळे श्वेता आजही चाहत्यांची लाडकी आहे. सध्या सोशल मीडियावर श्वेता तिवारीचा ब्राऊन कॉटन ड्रेसमधील लुक प्रचंड चर्चेत आहे. कोणताही डार्क मेकअप नाही, जड दागिने नाहीत, तरीही तिच्या या लुकने चाहत्यांच्या मनात थेट घर केलं आहे. तिच्या या लूकवरून चाहत्यांची देखील नजर हटली नाही. या फोटोमध्ये श्वेता तिवारी एका सोफ्यावर निवांत बसलेली दिसते.हातात पुस्तक, चेहऱ्यावर शांत भाव आणि अंगावर ब्राऊन रंगाचा साधा पण एलिगंट कॉटन ड्रेस. आजच्या ग्लॅमरच्या दुनियेत जिथे सतत हेवी मेकअप, डिझायनर कपडे आणि झगमगाट दिसतो, तिथे श्वेताचा हा साधा लुक खूप वेगळा आणि तितकाच आकर्षक वाटतो. श्वेता तिवारीच्या या लुकवरून कोणाचीच नजर हटत नाही आहे. श्वेता तिवारीने घातलेला हा ब्राऊन रंगाचा कॉटन कुर्ता साधेपणाचा उत्तम नमुना आहे.हलक्या आणि मऊ कॉटन फॅब्रिकमध्ये तयार केलेला हा कुर्ता शरीराला अगदी आरामदायक वाटेल असा आहे.कुर्त्याचा फ्लोई कट, साधा नेकलाइन डिझाइन आणि मोकळा घेर यामुळे तिचा लुक अधिकच एलिगंट दिसतो.

या लुकमध्ये श्वेता तिवारीने अतिशय सिंपल आणि नैसर्गिक मेकअप केला आहे. चेहऱ्यावर हलका बेस, सौम्य ब्लश आणि न्यूड लिप शेडमुळे तिचं सौंदर्य अधिक खुलून दिसतं. डोळ्यांसाठी तिने सॉफ्ट आयमेकअप निवडला कोणताही अतिरेक न करता केलेला हा मेकअप तिच्या साध्या पण एलिगंट लुकवरून कोणाची नजर हटत नाही आहे. या लुकमध्ये श्वेता तिवारीची युनिक आणि नैसर्गिक हेअरस्टाईल विशेष लक्ष वेधून घेते. तिने केस मोकळे ठेवत सौम्य स्ट्रेट लुक निवडला असून त्यामुळे तिच्या चेहऱ्यावरील भाव अधिक उठून दिसतात. कोणताही हेवी हेअरस्टाइल न करता साधेपणावर भर देण्यात आला आहे. हलका साइड पार्ट आणि केसांचा नैसर्गिक फ्लो यामुळे तिचा लुक अधिक सॉफ्ट आणि ग्रेसफुल वाटतो. श्वेता तिवारीच्या या साध्या पण सुंदर लुकवर सोशल मीडियावर चाहत्यांनी भरभरून प्रतिक्रिया दिल्या आहेत. अनेकांनी तिच्या साधेपणाचं कौतुक करत "खरी एव्हरग्रीन ब्यूटी" अशी कमेंट केली आहे. तर काहींनी "एज इज जस्ट अ नंबर", "सिंपल तरीही स्टनिंग" अशा प्रतिक्रिया दिल्या. काही चाहत्यांनी तर "ब्राऊन कॉटन ड्रेसमध्ये क्वीन व्हाइब्स" असे म्हणत तिच्या लुकला भरभरून दाद दिली आहे. एकूणच, श्वेता तिवारीचा हा लुक पुन्हा एकदा तिच्या लोकप्रियतेची साक्ष देतो.

### प्रत्येक सेवा करार वैध नसतो...



नोकरीच्या सुरुवातीच्या उत्साहात कर्मचारी अनेकदा अनेक कागदपत्रांवर स्वाक्षरी करतात. यापैकी एक म्हणजे, सेवा करार (सर्व्हिस बॉन्ड). अपूर्ण माहितीमुळे अनेक तरुण याला आपले नशीब मानतात आणि नंतर मनासारखी प्रगती न मिळाल्यासही नोकरीत घुसमटत राहतात. परंतु भारतीय कायदा आणि संविधान या विषयावर खूप स्पष्ट आणि संरक्षणात्मक दृष्टिकोन ठेवतात. या परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी हे उपाय उपयुक्त ठरू शकतात...कर्मचाऱ्यांकडे आहेत हे कायदेशीर अधिकारअनुच्छेद 23- हा कोणत्याही प्रकारच्या 'सक्तीच्या श्रमा'वर बंदी घालतो.अनुच्छेद 19(1)(g)- हा प्रत्येक नागरिकाला आपल्या आवडीचा व्यवसाय निवडण्याचे/बदलण्याचे पूर्ण स्वातंत्र्य देतो.कायदा स्पष्टपणे सांगतो की, जरी एखाद्या व्यक्तीने करारावर स्वाक्षरी केली असली तरी, नियोक्ता त्याला आपली मालमत्ता मानू शकत नाही. कर्मचाऱ्याकडे नोकरी सोडण्याचे स्वातंत्र्य नेहमीच सुरक्षित राहते.बॉन्ड कधी 'वैध' मानला जातो?

न्यायालये त्यांना पूर्णपणे नाकारत नाहीत, परंतु त्यांची वैधता काही कठोर निकषांवर तपासतात-बाँडची मुदत योग्य आहे का? जर कंपनी 5 वर्षांसारखा लांब कालावधी मागत असेल, तर ते अयोग्य मानले जाऊ शकते.कंपनीने कर्मचाऱ्यावर खरोखरच काही विशेष आणि महागडा खर्च केला आहे का? जर कोणतेही विशेष प्रशिक्षण दिले नसेल, तर केवळ बाँडच्या आधारावर वसुली करणे कठीण होते.

जर एखाद्या कर्मचाऱ्याचा पगार दरमहा ₹30,000 असेल आणि कंपनी त्याला नोकरी सोडल्यावर ₹1 कोटी रुपयांची मागणी करत असेल, तर न्यायालय याला 'दंड' मानते, 'वास्तविक नुकसानभरपाई' नाही. कायदा केवळ 'वाजवी नुकसानभरपाई' मिळवण्याची परवानगी देतो, जी कंपनीला झालेल्या वास्तविक नुकसानीशी संबंधित असावी.

या कृती देखील बेकायदेशीर आहेतअनेक कंपन्या कर्मचाऱ्यांना घाबरवण्यासाठी इतर मार्गांचा अवलंब करतात. जसे-सुरक्षेच्या नावाखाली मार्कशीट किंवा डिग्री स्वतःकडे ठेवणे इत्यादी. अशा प्रकारच्या कृती पूर्णपणे बेकायदेशीर आहेत. कोणताही नियोक्ता त्यांना 'सुरक्षितता' म्हणून ठेवू शकत नाही.कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र देणे ही कंपनीची जबाबदारी आहे. बॉन्ड वसुलीसाठी याचा वापर करणे 'छळ' मानले जाते.केलेल्या कामाचे वेतन मिळणे हा कर्मचाऱ्याचा वैधानिक अधिकार आहे. 'फुल अँड फायनल' सेटलमेंटच्या नावाखाली पूर्ण पगार रोखणे बेकायदेशीर आहे.बॉन्डचा उपयोग फायदा मिळवण्यासाठी किंवा धमकावण्यासाठी केला जाऊ शकत नाही. जर नियोक्त्याला बॉन्ड अंतर्गत कोणताही दावा करायचा असेल, तर त्याला कायदेशीर प्रक्रियेद्वारे तो करावा लागेल, वेतन किंवा कागदपत्रे रोखून नव्हे.

# मल्हार पाटेकरांनी शेअर केले अजित पवारांचे फोटो

## नाना पाटेकर यांच्या फार्महाऊसमध्ये दिसले माजी उपमुख्यमंत्री

नाना पाटेकर यांचे पुत्र मल्हार पाटेकर यांनी गुरुवारी दिवंगत अजित पवार यांच्या आठवणीत सोशल मीडियावर काही फोटो शेअर केले आहेत. या फोटोंसोबत त्यांनी पवार कुटुंब आणि पाटेकर कुटुंबातील जुन्या नात्याबद्दलही सांगितले.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री राहिलेले अजित पवार यांचे बुधवारी विमान अपघातात निधन झाले, त्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात दुःखाचे वातावरण आहे.

मल्हार यांनी शेअर केलेल्या फोटोंमध्ये अजित पवार, नाना पाटेकर आणि त्यांच्या कुटुंबासोबत पुण्याजवळच्या फार्महाऊसमध्ये दिसत आहेत. फोटोंमध्ये पाहता येते की अजित पवार तिथे खासगी जेवणासाठी गेले होते आणि कुटुंबासोबत वेळ घालवत होते. हे फोटो डोंजे परिसरात असलेल्या नाना पाटेकर यांच्या फार्महाऊसचे आहेत.

अजित पवार यांना आठवून मल्हार यांनी आपल्या पोस्टमध्ये लिहिले की, अजित पवारांचे निधन त्यांच्यासाठी वैयक्तिक नुकसान आहे. ते म्हणाले की, पवार त्यांच्या





कुटुंबासारखे होते आणि नेहमीच राहतील. त्यांच्यासोबत घालवलेले क्षण कधीही विसरता येणार नाहीत.

मल्हार यांनी असेही लिहिले की, हे नुकसान कधीही भरून निघू शकत नाही.

अजित पवार अनेकदा नाना पाटेकर यांच्या फार्महाऊसवर येत असत. येथे ते नाना पाटेकर यांच्यासोबत बसून जेवण करत आणि गप्पा मारत असत.

नाना पाटेकर यांनी अनेकदा सार्वजनिक व्यासपीठांवर अजित पवारांचे कौतुकही केले होते. ते म्हणाले होते की, पवार आपले काम कोणत्याही दिखाव्याशिवाय करत होते आणि नेहमी जबाबदारीने पुढे जात होते.

## 'अक्षय कुमार पैशांच्या मागे धावणारा':निर्माता शैलेंद्र सिंह यांचा दावा- चित्रपट फ्लॉप झाल्यानंतर अभिनेत्याने फी परत करण्यास नकार दिला होता

चित्रपट निर्माता आणि प्रोड्यूसर शैलेंद्र सिंह यांनी अभिनेता अक्षय कुमारबद्दल सांगितले की तो पैशाच्या मागे धावणारा (मनी माइंडेड) आहे. तो आधी व्यावसायिक आहे आणि नंतर अभिनेता आहे.

शैलेंद्र सिंह यांनी ही गोष्ट नुकत्याच सिद्धार्थ कन्ननला दिलेल्या एका मुलाखतीत सांगितली. मुलाखतीत शैलेंद्रने 2009 च्या `8 x 10 तस्वीर` या चित्रपटाशी संबंधित आपला अनुभव शेअर केला. त्यांनी सांगितले की या चित्रपटाच्या अपयशानंतर त्यांनी चित्रपट बनवणे सोडून दिले होते.

शैलेंद्र सिंह म्हणाले की त्यांचे विधान कोणत्याही वैयक्तिक नाराजीवर आधारित नाही. त्यांनी सांगितले की अक्षय एक चांगला माणूस आहे आणि दोघांमधील संबंध चांगले होते. त्यांनी सांगितले की ते एकत्र खेळही खेळत होते. शैलेंद्र म्हणाले की जेव्हा त्यांना अक्षयसोबत चित्रपट बनवण्याची संधी मिळाली, तेव्हा ते खूप आनंदी होते.

त्यांनी सांगितले की `8 x 10 तस्वीर` हा चित्रपट त्यावेळी बनला होता जेव्हा अक्षय कुमार आणि दिग्दर्शक नागेश कुकुनूर दोघेही त्यांच्या करिअरच्या चांगल्या टप्प्यात होते. सुरुवातीला हा चित्रपट 30 ते 35 कोटी रुपयांच्या बजेटमध्ये बनवला जाणार होता.



शूटिंगसाठी मुन्नार हे ठिकाण निश्चित करण्यात आले होते, परंतु अक्षयच्या व्यस्त वेळापत्रकामुळे योजना बदलत गेली.शैलेंद्र म्हणाले, "मुन्नारहून आम्ही कॅलगरीला गेलो, मग केप टाऊनला गेलो आणि त्यानंतर इतर अनेक ठिकाणी शूटिंग झाले." त्यांनी सांगितले की, वारंवार लोकेशन बदलल्यामुळे चित्रपटाचे बजेट खूप वाढले. हा चित्रपट अक्षयच्या सुपरहिट चित्रपट `सिंग इज किंग` नंतर लगेच प्रदर्शित झाला होता, पण बॉक्स ऑफिसवर हा चित्रपट पूर्णपणे फ्लॉप ठरला.

चित्रपट फ्लॉप झाल्यानंतर शैलेंद्र यांनी अक्षयला त्याच्या मानधनाचा काही भाग परत करण्याची विनंती केली. ते म्हणाले, "मी त्याला सांगितले की, भाऊ, तुझा चित्रपट पाहण्यासाठी कोणी आले नाही. तुलाही काही जबाबदारी घ्यावी लागेल.

तू माझ्याकडून खूप पैसे घेतले आहेत."

## काशीला पोहोचले अभिनेते अनुपम खेर

### बाबा विश्वनाथ आणि संकट मोचन मंदिरात दर्शन-पूजन केले

बॉलिवूड अभिनेते अनुपम खेर म्हणाले- काशीला येऊन मन प्रसन्न होते. शुक्रवारी अनुपम खेर काशीला पोहोचले.

त्यांनी बाबा विश्वनाथांचे दर्शन घेतले आणि हर-हर महादेवचा जयघोष केला. शिव मंत्राचा जप करत भगवान भोलेनाथांचा आशीर्वाद घेतला. त्यांच्यासोबत ज्योतिषाचार्य चंद्रमौली देखील होते.

बाबा विश्वनाथांच्या दर्शनानंतर अनुपम खेर संकटमोचन हनुमान मंदिरातही पोहोचले. तेथे त्यांनी बजरंगबलीचे दर्शन घेऊन देश आणि कुटुंबाच्या सुख-समृद्धी, शांती आणि आनंदासाठी प्रार्थना केली. मंदिरात दर्शनादरम्यान त्यांनी पूर्ण श्रद्धेने पूजा-अर्चा केली आणि काही काळ ध्यानही केले.

अनुपम खेर म्हणाले- काशीला आल्यावर त्यांना आत्मिक शांतीचा अनुभव येतो. बाबा विश्वनाथ आणि संकटमोचन हनुमानजींच्या दर्शनाने मनाला विशेष समाधान मिळते. आजच्या काळात देश आणि समाजासाठी सकारात्मक ऊर्जा, शांती आणि एकतेची सर्वाधिक गरज आहे, याच भावनेने त्यांनी प्रार्थना केली आहे.

अनुपम खेर यांच्या काशी





आगमनाची माहिती मिळताच मंदिर परिसरात उपस्थित भाविकांमध्येही उत्साह दिसून आला. अनेकांनी त्यांच्यासोबत फोटो काढले आणि त्यांचे अभिवादन केले. त्यांनीही सर्वांचे अभिवादन स्वीकारत काशीच्या आध्यात्मिक वैभवाची प्रशंसा केली.

अभिनेते अनुपम खेर आजपासून सुरू होणाऱ्या बनारस लिट फेस्टमध्येही सहभागी होतील. 30 जानेवारी 2026 ते 1 फेब्रुवारीपर्यंत चालणाऱ्या तीन दिवसीय कार्यक्रमात 200 हून अधिक वक्ते, कलाकार, लेखक आणि परफॉर्मर्स तसेच 50 देशांतील लोक सहभागी होतील.



## अभिनेता विशाल जेठवाच्या आईने सॅनिटरी पॅड विकले:धुणीभांडी केली; मर्दानी-2 चा क्रूर खलनायक होमबाउंडचा नायक बनला, चित्रपट ऑस्करला पोहोचला



अभिनेता विशाल जेठवाचा नीरज घायवान दिग्दर्शित `होमबाउंड` हा चित्रपट ऑस्करच्या शर्यतीतून बाहेर पडला असला तरी. या चित्रपटाने विशालला आंतरराष्ट्रीय स्टार बनवले. कान्स फिल्म फेस्टिव्हलसह अनेक प्रमुख आंतरराष्ट्रीय महोत्सवांमध्ये या चित्रपटाचे प्रदर्शन झाले. जिथे चित्रपटाचे खूप कौतुक झाले.

या चित्रपटाद्वारे विशाल जेठवा जागतिक स्तरावर पोहोचला असला तरी, इथपर्यंत पोहोचण्याचा त्याचा प्रवास इतका सोपा नव्हता. अभिनेत्याचे बालपण मुंबईतील चाळीत अत्यंत गरिबीत गेले. त्याचे वडील नरेश जेठवा नारळपाणी विकायचे. विशाल 13 वर्षांचा असतानाच त्याच्या वडिलांचे निधन झाले.विशाल जेठवाच्या आई प्रीती जेठवा यांनी कुटुंबाचे पोट भरण्यासाठी घरांमध्ये साफसफाईचे काम केले, इतकेच नव्हे तर सॅनिटरी पॅड्सही विकले. पण मुलाचे स्वप्न कधीही तुटू दिले नाही. आईच्या पाठिंब्यामुळेच विशाल अभिनेता बनला. सुरुवातीला त्याला अनेक नकारांना सामोरे जावे लागले, पण त्याने कधीही धीर सोडला नाही.

आजच्या सक्सेस स्टोरीमध्ये आपण विशाल जेठवाच्या करिअर आणि त्याच्या आयुष्याशी संबंधित काही खास किस्से त्याच्याच शब्दांत जाणून घेणार आहोत...

मी निम्न मध्यमवर्गीय कुटुंबातून आलो आहे. तुम्ही याला गरीब कुटुंबही म्हणू शकता. माझ्या वडिलांनी नारळपाणीही विकले आहे. बिअर बारसाठी शेंग-चण्याचे पॅकेटही बनवले आहेत. मी स्वतः बिअर बारसाठी शेंग-चण्याचे पॅकेट बनवण्यात त्यांना मदत करत असे. मी 13 वर्षांचा होतो, तेव्हा वडिलांचे निधन झाले.

ही 2008 सालची गोष्ट आहे. तो सर्वात वाईट काळ होता. त्यावेळी आम्ही मालाडमधील चाळीतल्या घरात राहत होतो. घरात पंखा आणि एसीही नव्हता. खूप कर्ज झाले होते. ते कर्ज फेडण्यासाठी आम्हाला आमचे घर विकावे लागले, तरीही आम्ही फक्त 20 टक्केच कर्ज फेडू शकलो होतो. आम्ही मालाडहून मीरा रोडला भाड्याच्या घरात स्थलांतरित झालो होतो.

मी मलाडमधील गुजराती माध्यमाच्या शाळेतून सहावीपर्यंत शिक्षण घेतले. त्यानंतर मीरा रोडला स्थलांतरित झालो. पुढील शिक्षण भाईंदरच्या अभिनव विद्या मंदिरातून घेतले. त्यानंतर कांदिवलीच्या ठाकूर कॉलेजमध्ये बी.कॉमला प्रवेश घेतला, पण पदवी पूर्ण करू शकलो नाही.

वडिलांच्या निधनानंतर माझ्या आईला खूप संघर्ष करावा लागला. कुटुंबाचे पोट भरण्यासाठी आईने घरांमध्ये झाडू-पोछा केला, इतकेच नव्हे तर सॅनिटरी पॅड्सही विकले. आईने प्रत्येक पावलावर मला साथ दिली.पदवी शिक्षण अर्धवट सोडले, जेणेकरून मीही काही काम करू शकेन. मी कठोर संघर्ष पाहिला, भूक आणि गरिबी खूप पाहिली. काहीतरी काम करून घराला आधार देऊ इच्छित होतो.

2009 मध्ये मी बॅकग्राउंड डान्सर बनलो होतो. मी 'सा रे गा मा पा लिल चॅम्प्स'मध्ये बॅकग्राउंड डान्सर होतो. त्याच्या ग्रँड फिनालेमध्ये सलमान खान सर, अजय देवगण सर आणि असिन मॅम त्यांच्या 'लंडन ड्रीम्स' चित्रपटाच्या प्रमोशनसाठी आले होते.

## विवेक ओबेरॉयच्या पत्रकार परिषदेनंतर संतापला होता सलमान

### निर्माता शैलेंद्र सिंह यांनी अभिनेत्याला शांत राहण्याचा सल्ला दिल्याचे सांगितले

चित्रपट निर्माता शैलेंद्र सिंह यांनी नुकतेच सांगितले की, विवेक ओबेरॉयने पत्रकार परिषदेत सलमानवर आरोप केल्यानंतर सलमान खूप रागात होता.

विशेष म्हणजे, चित्रपटसृष्टीत सलमान खान आणि विवेक ओबेरॉय यांच्यात जुना वाद आहे. जेव्हा विवेकने सलमानने त्याला धमकी दिल्याचे आरोप केले होते, तेव्हा हा वाद आणखी वाढला होता. आता या प्रकरणाबाबत निर्माता शैलेंद्र सिंह यांनी काही गोष्टी समोर आणल्या आहेत.

नुकत्याच सिद्धार्थ कन्ननला दिलेल्या मुलाखतीत शैलेंद्र सिंह यांनी सांगितले की, विवेकच्या पत्रकार परिषदेनंतर ते सलमानच्या घरी गेले होते. त्यावेळी अभिनेता खूप संतापलेला होता.

शैलेंद्र यांनी सांगितले की, त्यांनी सलमानला घाईघाईने कोणतेही पाऊल न उचलण्याचा सल्ला दिला होता. त्यांनी अभिनेत्याला सांगितले, "आयुष्यात आपण प्रतिक्रिया देण्याऐवजी कृती केली पाहिजे. जे काही करायचे आहे, ते नंतरही करता येते. आता शांतपणे बस आणि वेळेला त्याचे काम करू दे."

शैलेंद्र यांच्या मते, सलमानने त्यांचे ऐकले आणि त्यावेळी कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही.

चित्रपट निर्मात्याने मुलाखतीत असेही सांगितले की त्याने (सलमानने) तो लढा शांतपणे दिला. मला वाटते की आता विवेक बॉलिवूडमध्ये काम करत नाहीये. मला पूर्णपणे माहीत नाही, पण असेच वाटते. विवेकही असेच म्हणतो, ते खूप शहाणपणाचे पाऊल होते. कोणालाही दुखापत न करणे आणि स्वतःवर आरोप येऊ न देणे, मला वाटते की हा योग्य मार्ग होता. मुलाखतीत शैलेंद्रने सलमानबद्दल असेही सांगितले की, सलमान जंगलात जन्माला आलेला वाघ आहे, पण आता तो प्राणिसंग्रहालयात आहे. त्यांच्या मते, यश मिळाल्यानंतर सलमान भित्रा झाला.



## अर्थविश्व...

### सोनं-चांदीचे दर अचानक घसरले, गुंतवणूकदाराच्या पदरी निराशा..



मुंबई: चांदीचे दर आतापर्यंतच्या उच्चांकावर पोहोचत आहेत. अशा परिस्थितीत, आज चांदीच्या किमतीत झालेल्या घसरणीमुळे लोकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. चांदीच्या किमती प्रति ग्रॅम 10 रुपयांनी कमी झाल्या आहेत. एक ग्रॅम चांदी 415 रुपयांना आणि एक किलो 415,000 रुपयांना विकली जात आहे. या परिस्थितीत, येत्या काळात चांदीच्या किमतीची संभाव्य पातळी तज्ज्ञांनी वर्तवली आहे. ब्रोकरेज फर्म सिटीने Silver Price Predication जारी केला आहे. त्यानुसार, पुढील 3 महिन्यांत किंमत प्रति औंस 150 डॉलर्सपर्यंत वाढेल. पूर्वी ती 100 डॉलर्स होती. बाजारपेठेतील वाढ, मौल्यवान धातूंकडे गुंतवणूकीचा कल आणि उद्योगात चांदीची मागणी वाढल्यामुळे किंमत वाढेल असा सिटीचा अंदाज आहे. गेल्या दोन आठवड्यात चांदीच्या किमती 30 टक्क्यांहून अधिक वाढल्या आहेत. अलीकडेच आपला अंदाज $110 पर्यंत वाढवला असला तरी, चांदी सध्या त्या पातळीच्या वर व्यापार करत आहे. भारतीय चलनात, त्याची किंमत प्रति औंस सुमारे $150 किंवा अंदाजे 5.5 दशलक्ष रुपये प्रति किलो असण्याची अपेक्षा आहे.

गुंतवणूकदार सोन्यापासून चांदीकडे पैसे वळवत आहेत. सोन्याच्या किमतीत मोठी वाढ झाली असली तरी, सोन्याच्या तुलनेत चांदीची किंमत कमी असल्याने सिटी बँकेचा अंदाज आहे की चांदीच्या किमती आणखी वाढण्याची शक्यता आहे. या परिस्थितीत, सिटी बँकेला येत्या आठवड्यात चांदीच्या किमती आणखी 30 ते 40 टक्क्यांनी वाढण्याची अपेक्षा आहे. म्हणूनच, त्यांनी प्रति औंस $150 चे तात्काळ लक्ष्य ठेवले आहे. ऐतिहासिकदृष्ट्या, सोन्याच्या तुलनेत चांदीच्या किमती $160 ते $170 दरम्यान आहेत. काही विशिष्ट परिस्थितीत किमती आणखी वाढू शकतात, अशा परिस्थितीत पुरवठ्याचा अभाव आहे.याचे मुख्य कारण म्हणजे चांदीच्या बाजारात पुरवठ्याचा अभाव. भू-राजकीय तणाव आणि इतर घटकांमुळे अल्पावधीत गुंतवणूक मागणी मजबूत राहण्याची सिटीला अपेक्षा आहे. गेल्या अनेक वर्षांपासून चांदीच्या पुरवठ्यात आणि मागणीत असंतुलन आहे. बाजार मुख्यत्वे विद्यमान साठ्यावर आधारित आहे. चांदीत गुंतवणूक करणारे गुंतवणूकदार सध्याच्या किमतींवर विक्री करण्यात रस घेत नाहीत. किंमती वाढत असल्या तरी, बाजारात येणारा पुरवठा कमी होत आहे. या घटकांमध्ये ईटीएफमधील चांदीच्या होल्डिंगमध्ये घट, कॉमेक्स फ्युचर्समधील गुंतवणूकदारांच्या होल्डिंगमध्ये घट आणि एक्सचेंज-ट्रेडेड फंडमध्ये वाढ यांचा समावेश होता. भौतिक बाजारपेठेतील मजबूत अल्पकालीन गती आणि स्थिरता या नकारात्मक घटकांपेक्षा जास्त आहे. सोने-चांदीच्या किमतीचे प्रमाण आता 50 च्या खाली आहे. चांदीच्या किमतीत घट होण्याचे हे सकारात्मक लक्षण आहे. चांदी सोन्यापेक्षा स्पष्टपणे महाग होईपर्यंत ही गती चालू राहू शकते.

### सरकारच्या एका निर्णयामुळे दैनंदिन जीवनातील टेन्शन मिटणार



मुंबई: UPI चा वापर झपाट्याने वाढत असला तरी, बदलाची समस्या अजूनही कायम आहे. या समस्येवर उपाय म्हणून, भारत सरकार लहान चलनी नोटांची उपलब्धता वाढवण्याची तयारी करत आहे. अनेकदा, जेव्हा आपण चहा पिण्यासाठी बाहेर जातो, ऑटो किंवा बसचे भाडे भरतो किंवा स्थानिक बाजारात खरेदी करतो तेव्हा आपल्याला पैशाच्या अभावामुळे अनेक समस्येचा सामना करावा लागतो. सरकारने उचलेल्या एका पावलामुळे आता अनेकांचा फायदा होणार आहे. या नवीन योजनेमुळे अनेक समस्या कमी होतील.

आता तुम्ही ATM 10, 20 किंवा 50च्या नोटा देखील काढू शकणार आहात. दररोज रोख व्यवहारांवर अवलंबून असलेल्या आणि ₹10, ₹20 आणि ₹50 च्या नोटांची आवश्यकता असलेल्या लोकांना लहान चलनी नोटा सहज उपलब्ध व्हाव्यात हे सरकारचे उद्दिष्ट आहे. सरकारने यासाठी पायलट प्रोजेक्ट देखील सुरू केले आहेत. असाच एक पायलट प्रोजेक्ट मुंबईत राबवला जात आहे, जिथे लहान चलनी नोटांची उपलब्धता वाढवण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. रुग्णालये, बस डेपो, रेल्वे स्टेशन, स्थानिक बाजारपेठ, सरकारी रुग्णालये आणि कार्यालये यासारख्या जास्त रहदारीच्या ठिकाणी ही नवीन एटीएम मशीन बसवण्याची सरकारची योजना आहे जिथे लोकांना सर्वात जास्त रोख रकमेची आवश्यकता आहे. या नवीन एटीएम मशीनमधून 100 आणि 500 च्या नोटा तसेच 10, 20 आणि 50 च्या छोट्या नोटा मिळतील. सरकार अशा मशीन बसवण्याची योजना आखत आहे जिथे लोक त्यांच्या 100 किंवा 500 च्या नोटा देऊन त्याबदल्यात 10, 20 किंवा 50 च्या नोटाही घेऊ शकतात. वाढत्या यूपीआयच्या या युगातही, लहान दुकानदार, प्रवासी, रस्त्यावरील विक्रेते आणि रोजंदारी कामगारांसह अनेक लोक अजूनही दैनंदिन व्यवहारांसाठी रोख रक्कम वापरतात. सध्या, मुंबईत याचसाठी एटीएम मशीनची चाचणी घेतली जात आहे. यशस्वी आणि मंजूर झाल्यास, ते देशभरात लागू केले जातील.

# IND vs NZ 5th T20 मॅचपूर्वी संघात होणार मोठा बदल, शेवटच्या सामन्यात मॅचविनरची एन्ट्री पक्की, दुखापतीतून सावरला



तिरुवंनमपूरम: भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील पाच सामन्यांच्या टी-20 मालिकेत पुनरागमन करणाऱ्या इशान किशनने आपल्या फलंदाजीने सर्वांची मने जिंकली. दोन वर्षांनी टीम इंडियात परतणाऱ्या Ishan Kishan दुसऱ्या टी-20 मध्ये 32 चेंडूत 76 धावा केल्या आणि भारताला एकतर्फी विजय मिळवून दिला. चौथ्या टी-20 मधून बाहेर पडल्यानंतर, आता शेवटच्या टी-20 मधील त्याच्या सहभागाबद्दल प्रश्न उपस्थित केले जात आहेत. आता पाचवा टी-20 सामना तो खेळणार की नाही ते पाहा...

इशान किशन चौथ्या टी-20 मध्ये भारताकडून खेळू शकला नाही. सूर्यकुमार यादवने सांगितले होते की, त्याला निगलची समस्या आहे. त्यामुळे संघाने दुसरा फलंदाज मैदानात उतरवला. इशान किशन च्या दुखापतीबद्दल, फलंदाजी प्रशिक्षक सीतांशू कोटक यांनी पाचव्या टी-20 पूर्वी पत्रकार परिषदेत सांगितले की, "इशान किशन आगामी सामना खेळू शकतो आणि पूर्णपणे तंदुरुस्त दिसत आहे." अंतिम निर्णय सामन्यापूर्वी फिजिओच्या अहवालाच्या आधारे घेतला जाईल.

2023-24 च्या दक्षिण आफ्रिका दौऱ्याच्या मध्यातच इशान किशनला संघातून वगळण्यात आले. त्यानंतर, राहुल द्रविडच्या कार्यकाळात, त्याला टीम इंडियामधून वगळण्यात आले आणि केंद्रीय करारातूनही काढून टाकण्यात आले. इशान किशनने टिकून राहून, देशांतर्गत क्रिकेटमध्ये सातत्याने धावा काढत, दोन वर्षांनंतर भारतीय टी-20 संघात पुनरागमन केले आणि स्वतःला सिद्ध केले.

इशान किशनने आतापर्यंत भारतासाठी 35 टी-20 आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत, ज्यामध्ये त्याने 908 धावा केल्या आहेत. आता, तो आगामी टी-20 विश्वचषक 2026 मध्ये धमाल करण्याची तयारी करत आहे. भारताचा पाचवा आणि शेवटचा टी-20 सामना उद्या रंगणार आहे. हा सामना तिरुवंनमपुरम येथे खेळवला जाणार आहे. भारताने या टी-20 मालिकेतील तीन सामने जिंकल्यामुळे मालिका ही आधीच जिंकली आहे. चौथा सामना न्यूझीलंडने जिंकला. आता पाचवा सामना जिंकून 4-1 ने मालिका जिंकण्याचा भारतीय संघाचा प्रयत्न असणार आहे. पुढील महिन्यात टी-20 विश्वचषकाची स्पर्धा रंगणार आहे. ही स्पर्धा भारत आणि श्रीलंकामध्ये रंगणार आहे.

## मित्र असावा तर असा! सूर्याने दाखवला मनाचा मोठेपणा, आऊट ऑफ फॉर्म असलेल्या संजूसाठी केलं खास काम

तिरुअनंतपुरम: भारतीय क्रिकेट संघ तिरुअनंतपुरम येथील ग्रीनफील्ड स्टेडियमवर न्यूझीलंडविरुद्ध पाचवा आणि शेवटचा टी-20 सामना खेळणार आहे. भारत न्यूझीलंडविरुद्ध टी-20 मालिका खेळत असून मालिका भारताने आधीच जिंकली आहे. पाच सामन्यांच्या मालिकेतील तीन सामने भारताने आधीच जिंकले आहेत. चौथा टी-20 सामना न्यूझीलंडने जिंकला. आता पाचव्या टी-20 सामन्यापूर्वी Suryakumar Yadav And Sanju Samson Video Viral होत आहे.

सूर्या बनला संजूचा बॉडिगार्ड

पाचव्या सामन्यासाठी भारतीय संघ तिरुअनंतपुरममध्ये पोहोचला आहे. जेव्हा संघ विमानातून उतरला आणि विमानतळावरून बाहेर पडत होता तेव्हा सूर्यकुमार आणि संजू एकत्र होते. सूर्यकुमारने तिथून संजूला चिडवण्यास सुरुवात केली. तो म्हणाला, "बाजूला जा, बाजूला जा. कृपया रस्ता मोकळा करा. चेट्टाला त्रास देऊ नका."

यानंतर संजू एस्केलेटरवरून खाली उतरत असताना, सूर्यकुमारने संजूला विचारले की, "देवभूमीत आल्यावर तुला कसं वाटतंय संजू?" संजूने उत्तर दिले, "खूप छान वाटत आहे." सूर्यकुमारने उत्तर दिले, "हे नेहमीच चांगले वाटते, पण यावेळी ते खूप खास आहे." मग, दोघे विमानतळाच्या बाहेर पडत असताना, सूर्यकुमार म्हणाला, सगळ्यांनी बाजूला व्हा बाजूला व्हा". संजू हसत होता आणि त्याच्या सभोवतालचे सुरक्षा रक्षकही हसत होते. संजू निघून गेला तेव्हा तिथे उभे असलेले चाहते "चेट्टा, चेट्टा" असे म्हणू लागले. याचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. संजू आणि सूर्या हे खूप चांगले मित्र आहेत अशी मस्ती करताना नेहमी पाहायला मिळते.



## कोहलीचे इंस्टाग्राम अकाउंट पुन्हा दिसू लागले:सर्च केल्यावर 'प्रोफाइल उपलब्ध नाही' असे दिसत होते; चाहते अनुष्काला कारण विचारत होते

विराट कोहलीचे इंस्टाग्राम अकाउंट पुन्हा दिसू लागले आहे. गुरुवारी रात्री त्यांचे अकाउंट अचानक बंद झाले होते. सर्च केल्यावर त्यांची प्रोफाइल दिसत नव्हती आणि डायरेक्ट लिंकद्वारेही अकाउंट उघडत नव्हते.कोहलीचे अकाउंट उघडण्याचा प्रयत्न केल्यावर 'हे पेज उपलब्ध नाही' असा मेसेज येत होता. त्यांच्या इंस्टाग्रामवर 274 दशलक्ष (27 कोटी 40 लाख) पेक्षा जास्त फॉलोअर्स आहेत.विराट कोहलीचे अकाउंट गायब झाल्यानंतर चाहत्यांनी त्यांची पत्नी आणि बॉलिवूड अभिनेत्री अनुष्का शर्माच्या अकाउंटवर जाऊन कारण विचारले होते.

या प्रकरणी आतापर्यंत विराट, त्यांची व्यवस्थापन टीम किंवा इंस्टाग्रामकडून कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. त्यामुळे खाते जाणूनबुजून निष्क्रिय केले होते की काही तांत्रिक बिघाड होता, हे स्पष्ट झालेले नाही.

अलीकडच्या काळात कोहलीच्या सोशल मीडियावरील हालचालीही मर्यादित राहिल्या आहेत. त्यांनी यापूर्वी अनेक प्रमोशनल पोस्ट हटवून क्रिकेट आणि कुटुंबाला प्राधान्य देण्याचे संकेत दिले होते. मीडिया रिपोर्ट्सनुसार, कोहली एका प्रमोशनल इंस्टाग्राम पोस्टसाठी सुमारे 12 ते 14 कोटी रुपये आकारतात.

जेव्हा चाहत्यांनी विराट कोहलीच्या इंस्टा अकाउंटला ॲक्सेस करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा त्यांना प्रोफाइल मिळाली नाही. यानंतर अनेक युजर्सनी यावर प्रतिक्रिया दिल्या.

18 जानेवारीला शतक झळकावले

वनडेमध्ये विराटने 18 जानेवारीला इंदूरमध्ये न्यूझीलंडविरुद्ध शानदार शतकी खेळी केली. या सामन्यात कोहलीने 108 चेंडूंमध्ये 124 धावा केल्या, ज्यात 10 चौकार आणि 3 षटकार समाविष्ट होते. मात्र, कोहलीच्या शतकानंतरही भारतीय संघ सामना जिंकू शकला नाही.विराट आता आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये 6 महिन्यांनंतर खेळताना दिसणार आहे. भारताची पुढील नियोजित एकदिवसीय मालिका इंग्लंडमध्ये इंग्लंडविरुद्ध होईल. ही तीन सामन्यांची मालिका 14 जुलैपासून सुरू होईल, ज्याचे सामने एजबेस्टन, कार्डिफ आणि लॉर्ड्समध्ये खेळले जातील.



कोहली क्रिकेटमधील दुसरा सर्वाधिक धावा करणारा खेळाडू

विराट कोहली सर्व फॉरमॅट (टेस्ट+वनडे+टी-20) मिळून सर्वाधिक धावा करणारा दुसरा खेळाडू आहे. त्याने 559 सामन्यांमध्ये 28215 धावा केल्या आहेत. पहिल्या क्रमांकावर भारताचाच सचिन तेंडुलकर आहे. तेंडुलकरच्या नावावर 664 सामन्यांमध्ये 34357 धावा आहेत.

कोहलीच्या नावावर 85 आंतरराष्ट्रीय शतके

विराट कोहलीच्या नावावर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एकूण 85 शतके जमा आहेत. कसोटी क्रिकेटमध्ये कोहलीने 123 सामन्यांच्या 210 डावांमध्ये 9230 धावा केल्या आहेत, ज्यात 30 शतकांचा समावेश आहे. 46.85 च्या सरासरीने खेळताना त्याची सर्वोच्च धावसंख्या 254 नाबाद राहिली आहे.वनडे क्रिकेटमध्ये त्याचा विक्रम आणखीनच शानदार आहे, जिथे 311 सामन्यांमध्ये 14797 धावांसह त्याच्या नावावर 54 शतके आहेत. 58.71 च्या सरासरीने आणि 93 पेक्षा जास्त स्ट्राइक रेटसह कोहलीला मर्यादित षटकांच्या सर्वात विश्वासार्ह फलंदाजांपैकी एक मानले जाते.टी-20 मध्येही त्याने 4188 धावा केल्या आहेत आणि 1 शतक ठोकले आहे. कोहलीने कसोटी आणि टी-20 मधून आधीच निवृत्ती घेतली आहे आणि तो फक्त वनडे फॉरमॅट खेळतो.

# अल्काराझ पहिल्यांदाच ऑस्ट्रेलियन ओपनच्या अंतिम फेरीत

## अलेक्झांडर झ्वेरेव्हला हरवले, जोकोविच किंवा सिनरशी अंतिम सामना होईल

वर्ल्ड नंबर-1 कार्लोस अल्काराजने पहिल्यांदा ऑस्ट्रेलियन ओपनच्या अंतिम फेरीत स्थान मिळवले आहे. त्याने दुखापतीच्या त्रासातूनही अलेक्झांडर झ्वेरेवला पाच सेटच्या रोमांचक सामन्यात हरवले.


रॉड लेव्हर एरिनामध्ये खेळल्या गेलेल्या या मॅरेथॉन सामन्यात अल्काराजने 5 तास 27 मिनिटे चाललेल्या लढतीत 28 वर्षीय जर्मन खेळाडूला 6-4, 7-6, 6-7, 6-7, 7-5 ने पराभूत केले.

आता अंतिम फेरीत 6 वेळा ग्रँड स्लॅम विजेता अल्काराजचा सामना डिफेंडिंग चॅम्पियन जॅनिक सिनर किंवा 10 वेळा ऑस्ट्रेलियन ओपन चॅम्पियन नोव्हाक जोकोविच यांच्यापैकी एकाशी होईल.विजयानंतर अल्काराज म्हणाला, मी नेहमी म्हणतो की परिस्थिती कशीही असली तरी, स्वतःवर विश्वास ठेवणे खूप महत्त्वाचे आहे. तिसऱ्या सेटच्या मध्यभागी मी खूप संघर्ष करत होतो आणि शारीरिकदृष्ट्या माझ्या कारकिर्दीतील सर्वात कठीण सामन्यांपैकी हा एक होता.

तो पुढे म्हणाला, मी यापूर्वीही असे सामने खेळलो आहे, त्यामुळे मला काय करायचे आहे हे माहीत होते. मला यात माझे सर्वस्व द्यायचे होते. मी तसेच केले आणि शेवटच्या चेंडूपर्यंत लढत राहिलो. पाचव्या सेटमध्ये मी ज्या प्रकारे पुनरागमन केले, त्यावर मला स्वतःवर खूप अभिमान आहे.

सेमीफायनलमध्ये विजयानंतर अल्काराज अशा प्रकारे कोर्टावरच झोपला.सेमीफायनलमध्ये विजयानंतर अल्काराज अशा प्रकारे कोर्टावरच झोपला.झ्वेरेव्हने 2024 मध्ये अल्काराजला बाहेर केले होते

अलेक्झांडर झ्वेरेव्ह आणि अल्काराज यांच्यात या सामन्यापूर्वी एकूण 12 सामने खेळले गेले होते, ज्यात दोघांनी 6-6 सामने जिंकले आहेत. 2024 ऑस्ट्रेलियन ओपनच्या उपांत्यपूर्व फेरीत झ्वेरेव्हनेच अल्काराजला हरवून स्पर्धेतून बाहेर काढले होते.



अल्काराजने गेल्या वर्षी 8 विजेतेपदे जिंकली होती

अल्काराजने गेल्या वर्षी उत्कृष्ट कामगिरी करत एकूण 8 विजेतेपदे जिंकली, जी त्या वर्षी कोणत्याही खेळाडूने जिंकलेल्या विजेतेपदांपेक्षा जास्त होती. यात फ्रेंच ओपन आणि यूएस ओपन यांसारख्या दोन ग्रँड स्लॅम विजेतेपदांचाही समावेश आहे. त्याने सलग 17 एटीपी मास्टर्स सामने जिंकले आणि 9 स्पर्धांच्या अंतिम फेरीत स्थान मिळवले.

अल्काराजला करिअर ग्रँड स्लॅम पूर्ण करण्याची संधी

अल्काराजच्या ट्रॉफी कॅबिनेटमध्ये आतापर्यंत ऑस्ट्रेलियन ओपन हा एकमेव ग्रँड स्लॅम खिताब शिल्लक आहे. जर त्याने यावर्षी मेलबर्नमध्ये विजय मिळवला, तर तो करिअर ग्रँड स्लॅम पूर्ण करणारा सर्वात कमी वयाचा पुरुष खेळाडू बनेल.

करिअर ग्रँड स्लॅम म्हणजे एखाद्या खेळाडूने आपल्या संपूर्ण करिअरमध्ये चारही ग्रँड स्लॅम किमान एकदा जिंकले असावेत. ते एकाच कॅलेंडर वर्षात जिंकणे आवश्यक नाही.

महिलांच्या अंतिम फेरीत सबालेंका विरुद्ध रायबकिना

महिला एकेरीच्या अंतिम फेरीत आर्यना सबालेंकाचा सामना एलिना रायबकिनाशी होईल. हा सामना रॉड लेव्हर एरिनामध्ये 31 जानेवारी रोजी दुपारी 2:00 वाजता खेळला जाईल. टॉप सीड सबालेंकाने वर्षातील पहिल्या ग्रँड स्लॅम ऑस्ट्रेलियन ओपनच्या महिला एकेरी गटाच्या उपांत्य फेरीत युक्रेनच्या एलिना स्वितोलिनाला सरळ सेटमध्ये 6-2, 6-3 असे हरवले.

## महत्त्वाचे...

### :जिल्हा परिषदेच्या निवडणुका पुढे ढकलल्याने शिक्षक अडचणीत



मुंबई - राज्यातील 12 जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या असल्या, तरी यामुळे शिक्षक वर्गासमोर एक मोठा पेच निर्माण झाला आहे. 7 आणि 8 तारखेला होणारी देशव्यापी C-TET परीक्षा आणि याच काळात आलेली निवडणूक ड्युटी एकाच वेळी आल्याने शिक्षकांमध्ये मोठी संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. करिअरच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असलेली परीक्षा द्यायची की शासकीय आदेशानुसार निवडणूक ड्युटी पार पाडायची, अशा दुहेरी संकटामुळे शिक्षक वर्गात संभ्रम निर्माण झाला आहे. शिक्षकांसाठी ही महत्त्वाची परीक्षा असल्याने या परीक्षेला बहुतांश शिक्षक बसलेले आहेत. अशा परिस्थितीत जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका आल्याने इलेक्शन ड्यूटीसाठी जावे लागणार की रद्द होणार? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. तसेच 3 तारखेला केंद्रप्रमुख परीक्षा आहे व 7 आणि 8 तारखेला C-TET परीक्षा आहे. दोन्ही परीक्षांचे केंद्र हे जिल्ह्याच्या बाहेर असणार आहेत आणि परीक्षेची वेळ सकाळी 8 वाजताची आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात जाहीर करण्यात आलेल्या तीन दिवसांच्या शासकीय दुखवट्याचा मोठा परिणाम स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर झाला आहे.

### ठाण्यात शिंदेसेनेचा डंका

ठाणे महानगरपालिकेतील सत्तास्थापनेचे राजकीय गणित अखेर अंतिम टप्प्यात आले असून, महापौरपदावर शिवसेना शिंदे गटाचाच दावा निश्चित झाल्याचे स्पष्ट झाले आहे. आज महापौर आणि उपमहापौर पदासाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा अंतिम दिवस असल्याने ठाण्याच्या राजकारणात सकाळपासूनच प्रचंड हालचाल आणि उत्सुकता पाहायला मिळाली. अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या चर्चांनंतर अखेर शिवसेनेकडून महापौरपदासाठी शर्मिला पिंपळोलकर यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे ठाण्याच्या सत्ताकारणात शिंदेसेनेचे वर्चस्व आणखी ठळक झाले आहे. महापौरपदाचा चेहरा निश्चित करण्यासाठी ठाणे महापालिकेच्या महापौर केबिनमध्ये शिवसेनेच्या सर्व महिला नगरसेवकांची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीला विमल भोईर, शर्मिला पिंपळोलकर आणि डॉ. दर्शन जानकर हे महापौरपदाचे प्रमुख दावेदार उपस्थित होते. बराच वेळ चर्चा आणि अंतर्गत मतमतांतरे मांडल्यानंतर अखेर नेतृत्वाने निर्णय घेत शर्मिला पिंपळोलकर यांच्या नावाला अंतिम मंजुरी दिले. पक्षातील वरिष्ठ नेत्यांनी संख्याबळ, अनुभव आणि स्थानिक पातळीवरील स्वीकारार्हता लक्षात घेऊन हा निर्णय घेतल्याची चर्चा आहे.दुसरीकडे, सुरुवातीला आक्रमक भूमिका घेतलेला भाजप आता सत्तेत सहभागी होण्यासाठी तयार झाल्याचे चित्र आहे. महापौरपदावर दावा सोडत भाजपने उपमहापौरपदावर समाधान मान्य केले. भाजपकडून कृष्णा पाटील यांना उपमहापौर पदासाठी उमेदवारी अर्ज भरण्याचे आदेश देण्यात आले असून, त्यामुळे ठाण्यातील सत्तास्थापनेचा मार्ग जवळपास मोकळा झाला आहे. महापौरपद मिळणार नसले तरी सत्तेत सहभाग ठेवण्यासाठी भाजपने ही तडजोड स्वीकारल्याचे बोलले जात आहे.

# अजित पवारांच्या निधनानंतर शरद पवार सक्रिय

## दूषित झालेल्या नीरा नदीची केली पाहणी, बारामतीकरांना आता 'साहेबांचा' आधार

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई- राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर बारामती व येथे राहणाऱ्या प्रत्येक नागरिकाची भावना ही पोरकेपणाची झाली होती. परंतु, आज अजित पवारांच्या अस्थि विसर्जनानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रमुख शरद पवार हे स्वतः बारामतीमध्ये सक्रिय झाल्याचे पाहायला मिळत आहे. आज बारामती येथे शरद पवारांकडून नीरा नदीची पाहणी करण्यात आली.

अजित पवारांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली आहे. विशेषतः बारामतीमध्ये सर्वत्र शुकशुकाट पाहायला मिळत आहे. अजित पवारांनी बारामतीचा कायापालट केला आहे, आता अजितदादानंतर बारामतीकडे कोण बघणार, इथल्या लोकांच्या समस्या कोण बघणार, असा प्रश्न बारामतीकरांना पडला होता. परंतु, अजित पवारांच्यानंतर आता शरद पवार बारामतीमध्ये सक्रिय झाले आहेत. त्यांनी येथील नीरा नदीची पाहणी केली आहे.

नीरा नदीबद्दल सातत्याने चर्चा होती की नीरा नदी प्रदूषित झाली आहे. आता त्याची पाहणी करून यासंदर्भात शरद पवारांनी माहिती घेतली आहे. अजितदादांच्या निधनाने शरद पवार खचल्याचे पाहायला मिळाले होते. मात्र, आज शरद पवारांनी पुन्हा कामाला सुरुवात करत बारामतीकरांना विश्वास धीर देण्यासाठी सक्रिय झाल्याचे पाहायला मिळत आहे.

शरद पवार जेव्हा नीरा नदीची पाहणी करण्यासाठी पोहोचले तेव्हा येथील स्थानिकांनी कार्यकर्त्यांनी येथील तक्रारी व समस्या मांडल्या. नदीचे पाणी क्षारयुक्त झाले असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. या दूषित पाण्यामुळे शेतीवर परिणाम होत असून जमिनी सुद्धा क्षारपट झाल्याचे येथील स्थानिकांनी सांगितले आहे. तसेच नीरा नदीत कारखान्याचे दूषित पाणी सोडल्याने नदीचे पाणी खराब झाले आहे. यावर कारखान्यांनी आता वेस्ट पाणी टाकणार नाही असे सांगितले असेल तरी इतर अनेक घटकांमुळे पाणी दूषित होत असल्याचे स्थानिकांनी सांगितले.

यावेळी शरद पवारांनी नदीच्या भागातील सर्व कारखान्यांची नावे घेतली. ज्यातून दूषित पाणी येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या कारखान्यांचे जे दूषित पाणी येत आहे,

ते नदीत सोडण्यापेक्षा बॉयलर सिस्टम आणावी, अशी मागणी स्थानिकांनी शरद पवारांकडे केली आहे. अजित पवारांनी देखील खूप लक्ष घातले असल्याची आठवण देखील यावेळी स्थानिकांनी सांगितली.

अनेक वर्षांपासून बारामतीची जबाबदारी शरद पवारांनी अजित पवारांकडे सोपवली होती. त्यानंतर शरद पवार हे देशाच्या राजकारणात सक्रिय होते. अजित पवारांनी बारामतीचा कायापालट केला.



अनेक विकासकामे इथे केली. मात्र, अजितदादांच्या अकाली निधनानंतर आता शरद पवारांनी पुन्हा एकदा बारामतीचे सूत्र हाती घेतल्याचे पाहायला मिळत आहे.

## मुंसौ. सुचिता कुनघटकर यांना साहित्य भूषण सन्मान



दिव्य वतन /वृत्तसेवा

आळंदी :-अष्टपैलू संस्कृती कला अकादमी, मुंबई आणि मासिक वृत्तपत्र न्यायप्रभात यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात सौ. सुचिता कुनघटकर यांना साहित्य भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा सन्मान सोहळा १८ जानेवारी रोजी सुवर्णकार समाज धर्मशाळा, आळंदी येथे पार पडला. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून जागतिक कीर्तीचे ज्येष्ठ साहित्यिक डॉ. मधुसूदन घाणेकर (पुणे) उपस्थित होते. अष्टपैलू संस्कृती कला अकादमीचे संस्थापक व अध्यक्ष शिवाजी खैरे, संस्थेच्या कोषाध्यक्षा ह.भ.प. सौ. अनुसया खैरे, महाराष्ट्र शासनाच्या एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नाशिक जिल्हा प्रकल्पाचे सी-डी-पी-ओ तसेच साहित्यिक कवी प्रताप पाटील, छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत ॲड. विनोद गोल्हर यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. डॉ. मधुसूदन घाणेकर यांच्या शुभहस्ते सौ. सुचिता कुनघटकर यांना सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, महावस्त्र व गुलाब पुष्प देऊन गौरविण्यात आले. साहित्य व समाजकार्य क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेऊन हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सौ. सुचिता कुनघटकर यांना यापूर्वीही अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यामध्ये रचीयता साहित्य रत्न पुरस्कार (२०२१), आदर्श महिला काव्यरत्न पुरस्कार, विश्वशांती समाजरत्न राष्ट्रीय पुरस्कार (२०२२) तसेच राज्यस्तरीय महाराष्ट्र भूषण पुरस्कार (२०२३) (वसुनंदिनी फाउंडेशन, जामनेर) यांचा समावेश आहे. त्या ९६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात निमंत्रित कवयित्री म्हणून सहभागी झाल्या असून विविध ठिकाणी प्रमुख पाहुण्या म्हणूनही त्यांनी उपस्थिती लावली आहे. या सन्मानाबद्दल त्यांच्या मित्रमंडळींसह साहित्यप्रेमी व कुटुंबीयांकडून त्यांचे अभिनंदन व कौतुक करण्यात येत आहे.

# अजित पवारांच्या NCP आमदारांची उद्या बैठक

## सारे जुळून आल्यास उद्याच शपथविधी; उपमुख्यमंत्री पदाबाबत छगन भुजबळांचे वक्तव्य

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई- राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांची उद्या बैठक होईल. त्यात विधिमंडळ पक्षनेतेपदाची आणि उपमुख्यमंत्रीपदाच्या नावाची निवड केली जाईल, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी दिली. छगन भुजबळ, सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल, धनंजय मुंडे या नेत्यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. तसेच अजित पवारांची खाती आणि इतर मुद्यांवर चर्चा झाली.

छगन भुजबळ माध्यमांशी बोलताना म्हणाले की, उपमुख्यमंत्री म्हणून सुनेत्रा पवार यांच्या नावाची चर्चा होत आहे. त्यांना उपमुख्यमंत्री करावे, अशी मागणी होत आहे. उद्या आमदाराची बैठक बोलावली आहे. सारे जुळून आल्यास, तर उद्याच शपथविधी होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली असतानाच उपमुख्यमंत्री पदावरून चर्चा सुरू झाली आहे. अनेकांचे म्हणणे आहे की सुनेत्रा पवार यांची निवड अजित पवारांच्या पदावर करण्यात यावी. त्यानुसार राजकीय वर्तुळात हालचाली देखील सुरू असल्याचे दिसून येत आहे.





मुख्यमंत्र्यांच्या भेटीनंतर तटकरे यांनीही पत्रकारांशी संवाद साधला असून, उपमुख्यमंत्री पदाबाबत धार्मिक विधी झाल्यानंतर निर्णय घेण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

धक्क्यातून सावरलो नाही

सुनील तटकरे म्हणाले, दादांच्या अकाली जाण्याच्या धक्क्यातून आम्ही कोणीही सावरलो नाहीये. आम्हाला अजूनही असे वाटते की दादा आमच्यातच आहेत. या शोकमग्न अवस्थेतच आम्ही आहोत. आज अजितदादांच्या अनुपस्थितीत कार्यालयात येणे हे माझ्यासाठी क्लेशकारक आहे. या कार्यालयात त्यांनी पक्षाचे संघटन उभे केले, इथे त्यांच्यासमोर नतमस्तक व्हावे यासाठी मी कार्यालयात आलो. याच भावनेने मी आलो होतो.

### तर उद्याच्या उद्या शपथविधी

छगन भुजबळ म्हणाले, दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार की नाही याबाबत मला फारसे माहित नाही. पण आता सध्या ही राष्ट्रवादी जी आहे अजित पवारांची, यात जे काही कामे आहेत, त्याकडे आपण लक्ष देत आहोत. उपमुख्यमंत्री पद रिकामे आहे, ते पद सुनेत्रा ताईंच्या माध्यमातून कसे भरता येईल त्यावर आमचे जास्त लक्ष आहे. बाकीचे पुढे बघता येईल. लोक जसे ठरवतील त्यानुसार निर्णय घेता येईल.

### धार्मिक विधी झाल्यानंतर ठरवू

पुढे बोलताना सुनील तटकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. त्यासंदर्भात बोलताना म्हणाले, आज मी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली हे खरे आहे. सुनेत्रा वहिनी आणि कुटुंब धार्मिक विधीमध्ये आहेत. धार्मिक विधी झाल्यानंतर आम्ही सर्व चर्चा करणार आहोत. आणि त्यानंतर आम्ही ठरवू. जे काही जनतेच्या मनात आहे, कार्यकर्त्यांच्या मनात आहे त्यानुसार निर्णय घेऊ. आज आपण पाहत आहोत की संपूर्ण राज्य शोकात आहे. दादांचे सर्व पैलू संबंध महाराष्ट्राने अनुभवले आहेत. त्यातच आम्ही आहोत, असे तटकरे यांनी म्हटले आहे.

### शो मस्ट गो ऑन- छगन भुजबळ

यासंदर्भात छगन भुजबळ यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, अजित पवार गेले आणि ज्या पद्धतीने गेले आहेत, त्यामुळे झोप उडाल्यासारखी झाली आहे. पण आता असे आहे की शेवटी 'शो मस्ट गो ऑन' असे म्हणतात, त्यामुळे कोणावर तरी जबाबदारी देऊन हे चालवले पाहिजे, पक्ष असेल सरकार असेल. उद्या मला असे वाटते की जे विधानमंडळातले जे नेते आहेत आमचे, त्यांची बैठक बोलावली आहे. त्यात पक्षाचे प्रमुख पद जे अजितदादांकडे होते, ते देण्याच्या संदर्भात निर्णय होईल.

### एकीकरणाचे फारसे माहिती नाही

पुढे बोलताना छगन भुजबळ म्हणाले, लोकांची जी मागणी आहे ती रास्त आहे. सुनेत्रा ताईंकडे पक्ष प्रमुख पद देण्यात यावे. अनेक लोकांची अशी मागणी आहे आणि त्यात काही चूक आहे, असे मला वाटत नाही. पण शेवटी याबाबत जो काही निर्णय होणार आहे तो सीएलपीमध्ये होईल. भुजबळ यांना दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या चर्चेविषयी विचारले असता, त्यांनी याबाबत मला फारसे काही माहित नसल्याचे स्पष्ट केले आहे.

# दादा तुम्हाला घट्ट मिठी मारायचीय:विकासरुपी फुलांच्या बागेत राख सावडण्याची वेळ येईल असं स्वप्नानतही वाटलं नव्हतं - रोहित पवार

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई- 'अजितदादांच्या निधनाची दुर्दैवी बातमी आल्यापासून डोकं सुन्न आहे. मन बर्फाप्रमाणे थिजलंय. अजितदादांनी जिथं विकासरूपी फुलांची बाग फुलवली, तिथंच त्यांची राख सावडण्याची वेळ येईल, असं स्वप्नानतही वाटलं नव्हतं,' अशी भावनिक प्रतिक्रिया रोहित पवार यांनी दिली. अजित पवार यांच्या विमान अपघाती मृत्यूनंतर पवार कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळलाय.

अजित पवारांच्या निधनानंतर आज त्यांची राख सावडण्याचा विधी सकाळी बारामती येथील विद्याप्रतिष्ठानमध्ये झाला. यावेळी पार्थ पवार, जय पवार, श्रीनिवास पवार, रोहित पवार आणि पवार कुटुंबातील इतर सदस्यांची उपस्थिती होती. या विधीनंतर रोहित पवारांनी सोशल मीडियात एक पोस्ट करून आपल्या भावनांना वाट मोकळी करू दिली.

अजित पवारांचा राख सावडण्याचा विधी झाला. त्यावेळी पार्थ आणि जय पवार.

अजित पवारांचा राख सावडण्याचा विधी झाला. त्यावेळी पार्थ आणि जय पवार.

रोहित पवारांची पोस्ट जशीच्या तशी...

रोहित पवार आपल्या 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हणतात, 'मा. अजितदादांनी जिथं विकासरूपी फुलांची बाग फुलवली तिथंच त्यांची राख सावडण्याची वेळ येईल, असं कधी स्वप्नातही आलं नाही.. पण नियतीच्या क्रूर खेळापुढं कुणाचं काही चालत नाही.. अजितदादांची ती दुर्दैवी बातमी आल्यापासून अद्यापपर्यंत डोकं सुन्न आहे... मन बर्फाप्रमाणे थिजलंय.. काय झालं, कसं झालं आणि का झालं, या विचाराचं मनातलं काहूर थांबत नाहीय...

आपल्यात आत्तापर्यंत जे-जे काही संभाषण झालं, चर्चा झाल्या, विशेषतः शेवटच्या काही दिवसांमध्ये झालेल्या भावनिक चर्चा, हे सगळं काही एखादा टेपरेकॉर्डप्रमाणे सारखं सारखं कानात घुमतंय. जणू काही तुम्हीच अदृश्य स्वरूपात बोलत आहात असा भास होतोय. तुमची ती काम करण्याची शैली, प्रशासनावर पक्की मांड, राजकारणावर मजबूत कमांड, परखड स्वभाव, हो ला हो आणि नाही ला नाही न करता जे असेल ते स्पष्ट सांगून समोरच्या व्यक्तीसोबत राजकारण न खेळण्याची पद्धत, कामाचा झपाटा, वेळेचं काटेकोर नियोजन या सगळ्याचं आम्हाला अक्षरशः कौतुक आणि आश्चर्यही वाटायचं.

सत्ता असो किंवा नसो, कायम तुमचा दरारा वाटायचा, आदरयुक्त भीती असायची. तुमचा सार्वजनिक वावर बघून तुम्हाला न भेटलेल्या अनेकांना तुम्ही फणसाप्रमाणे कठोर वाटायचात, पण तीच व्यक्ती जेंव्हा तुमच्या संपर्कात यायची तेंव्हा फणसातील रसाळ आणि मधुर गऱ्याप्रमाणे तुमचा स्वभाव पाहून ती तुमच्या प्रेमात पडायची, याचे आम्ही साक्षीदार आहोत.

पण अचानक असं काय झालं? दोन दिवसांपूर्वी महाराष्ट्राचा गाडा हाकणारा, दररोज भेटणाऱ्या शेकडो माणसांना मदत करणारा, त्यांची कामं करणारा, पहाटेपासून रात्रीपर्यंत महाराष्ट्राच्या विकासाचाच ध्यास घेणारा, सामान्य माणसासाठी वाऱ्याच्या वेगाने उर फाटेस्तोवर धावणारा पहाडासारखा माणूस असा एका क्षणात कसा निघून जाऊ शकतो? या प्रश्नाने डोक्याचा भुगा झालाय. पण काही प्रश्नांची उत्तरं मिळत नसतात, असं म्हणतात.

पण मा. अजितदादांच्या विकासाचा वेगच कदाचित नियतीला आवडला असावा आणि म्हणूनच अजितदादा लोकांसाठी धावत असतानाच त्याच वेगाने नियतीने त्यांच्यावर झडप घातली असावी. या नियतीबाबतच माझी तक्रार आहे..

ती कुठं करायची हे कळत नाही. पण माझा त्या नियतीला प्रश्न आहे, ''आमच्यासारखे लाख नेले असते तरी चाललं असतं, पण आमचा लाखांचा पोशिंदा तू का असा चोरून नेला? एका क्षणात तू लाखो जणांच्या लाखो स्वप्नांची राख का केलीस. दे ना उत्तर.''



अजितदादा तुमच्याविषयी देखील माझी तक्रार आहे. दोन दिवसांपासून महाराष्ट्र अक्षरशः स्तब्ध आहे.. प्रत्येकाच्या डोळ्यांतला अश्रूचा पूर कमी होत नाहीये.. हुंदके आणि आक्रोश ऐकून काळजात चर्रर्र होतंय.. आपल्या जाण्याने पाठीमागे दुःखाचे असे पाट वाहतील, याची चिंता दादा तुम्ही का केली नाही? एरवी कुणी थोडं जरी चुकलं तर त्याला चार चौघात झाप झाप झापणारे तुम्ही त्या नियतीलाही त्याच जरबेच्या आवाजात का नाही खडसावलं?

महाराष्ट्राची अजून कित्येक कामं बाकी असताना वेळ न घेता तू अशी आलीच कशी? दादा, तुमचा आवाज ऐकूणच ती नक्की घाबरली असती. पण तुम्ही तिलाही नाराज केलं नाही. मोकळ्या हाताने तिलाही माघारी पाठवलं नाही. आलेल्या प्रत्येकाचं काम करायचं, हेच तर तुमचं वैशिष्ट्य होतं. पण दोन दिवसांपासून दुःखाच्या पुरात आकंठ बुडालेला महाराष्ट्र पाहून आता त्या नियतीलाही नक्कीच पश्चात्ताप होत असेल.